रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३२०
www.ramprahar.com

◆ सोमवार, ८ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

चौक-कर्जत मार्गावर अपघातात चौघे जखमी/२
सावरोलीतून दोन सख्ख्या भावंडांचे अपहरण/५
अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटीवर भारताची पकड/८

## नीट यूजी पुनर्परीक्षेची शहर सूचना स्लिप उपलब्ध

**नवी दिल्ली :** नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) २१ जून रोजी होणार असलेल्या नीट यूजी पुनर्परीक्षेची शहर सूचना स्लिप जाहीर केली आहे. विद्यार्थी neet.nta.nic.in या अधिकृत वेबसाइटवरून शहर सूचना स्लिप तपासू आणि डाऊनलोड करू शकतात. याद्वारे उमेदवारांना आपले परीक्षा केंद्र जाणून घेऊन आवश्यक प्रवासाचे नियोजन करता येणार आहे. ही स्लिप म्हणजे परीक्षेचे प्रवेशपत्र अर्थात हॉल तिकीट नाही. एनटीए लवकरच हॉल तिकीट ऑनलाइन उपलब्ध करून देणार आहे. नीट यूजी पुनर्परीक्षा देशातील ५५१ शहरांमध्ये आणि देशाबाहेरील १४ शहरांमध्ये लेखी (पेन-ॲण्ड-पेपर) पद्धतीने घेतली जाईल. ही परीक्षा २१ जून रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत होईल. परीक्षेच्या वेळेत परीक्षेशी संबंधित औपचारिक कामांसाठीचा वेळदेखील समाविष्ट आहे.

# पुण्यात रेव्ह पार्टीवर पोलिसांचा छापा

## तब्बल १५६ जण ताब्यात, ८५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील तुळापूर येथील एका खासगी बंगल्यात सुरू असलेल्या रेव्ह पार्टीवर गुन्हे शाखेने रविवारी (दि.७) मध्यरात्री धाड टाकली. या कारवाईत तब्बल १०७ तरुण आणि ४९ तरुणी अशा एकूण १५६ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून सुमारे ८५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत तुळापूर येथील एका आलिशान बंगल्यात 'प्रोजेक्ट एक्स' या नावाने रेव्ह पार्टी सुरू होती. ब्लेज एंटरटेनमेंटचे ऐमन शेख आणि स्टार लाईट एंटरटेनमेंटचे यश चौधरी यांनी ही पार्टी आयोजित केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने मध्यरात्री सुमारे अडीच वाजता या ठिकाणी छापा टाकला.



पोलिसांनी बंगल्याची झडती घेतली असता गांजा तसेच बंदी असलेल्या हुक्का फ्लेवर्सचे पॉट्स जप्त करण्यात आले. पार्टीत उपस्थित असलेल्या अनेकांकडून हुक्क्याचे सेवन करण्यात आल्याचेही निष्पन्न झाले आहे.

तपासादरम्यान या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मद्यसाठा आढळून आला. पोलिसांनी नऊ लाख २२ हजार रुपयांचे मद्य जप्त केले. धक्कादायक बाब म्हणजे या पार्टीत उपस्थित असलेल्या तिघांचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असल्याचे आढळून आले. त्यामुळे मद्यविक्री व सेवनासंबंधीच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

पहाटे सुरू झालेली ही कारवाई सकाळपर्यंत सुरू होती. पोलिसांनी मद्यसाठा, ध्वनीप्रणाली, हुक्का साहित्य आणि इतर साहित्य असा एकूण सुमारे ८५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी आयोजक, बंगल्याचा मालक आणि संबंधित व्यवस्थापकांची चौकशी सुरू असून अमली पदार्थ, मद्य नियमांचे उल्लंघन आणि इतर कायदेशीर बाबींतर्गत संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### पनवेल परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित

# आमदार प्रशांत ठाकूर यांची महावितरण कार्यालयात धडक




### अधिकाऱ्यांना जाब विचारत व्यक्त केली नाराजी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठेसह पनवेल परिसरातील विविध भागांमध्ये सातत्याने होत असलेल्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या गंभीर समस्येमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि.७) थेट भिंगारी येथील महावितरण कार्यालयात धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी त्यांनी कार्यकारी अभियंत्यांसोबत सविस्तर चर्चा करून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

पनवेल, कामोठे तसेच आसपासच्या परिसरात नियमितपणे वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक, व्यापारी आणि विद्यार्थीवर्गाला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी निदर्शनास आणून दिले. महावितरणकडून या समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत त्यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना दिल्या. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तातडीने आणि प्रभावी उपाययोजना राबविण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली तसेच नागरिकांना वारंवार होणाऱ्या त्रासातून दिलासा मिळावा यासाठी आवश्यक तांत्रिक सुधारणा आणि देखभाल कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही दिले.

यावेळी भाजपचे कामोठे मंडळ अध्यक्ष नगरसेवक विकास घरत, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, प्रदीप भगत, रवींद्र जोशी तसेच दामोदर चव्हाण व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या विजेच्या महत्त्वाच्या प्रश्नावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेचे जनतेमधून समर्थन केले जात आहे.

### जनआंदोलन, टाळे ठोकण्याचा इशारा

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी इशारा देताना सांगितले की, महावितरणचा निष्काळजीपणा आणि दुर्लक्षपणा यापुढे खपवून घेतला जाणार नाही. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी त्वरित पावले उचलली नाहीत, तर जनआंदोलन छेडले जाईल तसेच महावितरणचा असाच ढिसाळ कारभार सुरू राहिल्यास संबंधित कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल.

# मुंबई विमानतळावर पाच कोटींचे सोने जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

ऑपरेशन गोल्डन नेक्सस अंतर्गत मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तचर संचालनालय (डीआरआय) विभागाने सोन्याच्या तस्करीच्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत सुमारे ३.२ किलो परदेशी सोन्याची धूळ (वॅक्स स्वरूपात) जप्त करण्यात आली असून त्याची किंमत अंदाजे पाच कोटी रुपये आहे. या प्रकरणात तीन बांगलादेशी व श्रीलंकन नागरिक, तीन विमानतळ कर्मचारी आणि एक रिसिव्हर अशा एकूण सात जणांना अटक करण्यात आली आहे.

### कर्मचाऱ्यांसह सात जण अटकेत

डीआरआयच्या माहितीनुसार बँकॉकहून मुंबईमार्गे प्रवास करणारे परदेशी नागरिक शरीरात सोने लपवून आणत होते, तर विमानतळावरील काही कर्मचारी हे सोने बाहेर काढून स्थानिक एजंटांकडे पोहचवत होते. कारवाईदरम्यान दोन बसचालक आणि एका कोच मॉनिटरला सोन्याची डिलिव्हरी करताना पकडण्यात आले.

कस्टम्स कायदा १९६२ अंतर्गत सोने जप्तीची ही कारवाई करण्यात आली असून संपूर्ण तस्करी साखळी उद्ध्वस्त करण्यात डीआरआयला यश आले आहे. याप्रकरणी अधिक तपास सुरू असून हे सोने कुठून आले होते, नेमके कुठे जाणार होते याबाबत सखोल चौकशी सुरू आहे.

देशाची आर्थिक राजधानी असल्याने मुंबईत दररोज अब्जावधींची उलाढाल होत असते. यामध्ये अवैध धंदे, तस्करी, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीच्याही घटना समोर येतात. सोने तस्करी हेही पोलीस व यंत्रणांपुढे आव्हान असते, परंतु डीआरआय विभागाकडून सातत्याने मुंबई विमानतळावरून होणारी तस्करी रोखण्यात यश येत आहे.

## जासई येथील तलावात बुडून तीन मुलींचा मृत्यू

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जासई येथील तलावात पोहण्यासाठी गेलेल्या तीन अल्पवयीन मुलींचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. शनिवारी (दि.६) दुपारी ही दुर्दैवी घटना घडली.

हरियाणा रमजान परवीन (८), रविना रमजान परवीन (७) आणि सौम्या कन्हैय्या प्रजापती (१३) अशी मयत मुलींची नावे आहेत. या मुली तलावात पोहण्यासाठी उतरल्या होत्या, मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने त्या बुडाल्या. यावेळी स्थानिक नागरिक व नातेवाइकांनी तलावाकडे धाव घेऊन मुलींना तलावातून बाहेर काढून रुग्णालयात हलविले, मात्र डॉक्टरांनी तपासणी करून तिघीही मृत असल्याचे घोषित केले.

## निवडक

### वरळीतील हायप्रोफाइल कॉन्सर्टमध्ये तरुणाचा मृत्यू

**मुंबई :** वरळी येथील एनएससीआय डोममध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका हायप्रोफाइल कॉन्सर्टदरम्यान २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. वृषभ गांगुर्डे असे त्याचे नाव असून आणखी एका ३१ वर्षीय महिलेची प्रकृतीही बिघडल्याची माहिती समोर आली आहे. प्रज्ञान रे असे तिचे नाव आहे. तिला जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी आयोजकांविरोधात चौकशी सुरू केली आहे.

### पालघरमध्ये गॅस टँकर उलटून वाहतूक ठप्प

**पालघर :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पालघरमधील महालक्ष्मी परिसरात रविवारी (दि. ७) चालकाचे नियंत्रण सुटल्याने एक गॅसवाहक टँकर खड्ड्यात उलटला. अपघातानंतर टँकरमधून कार्बनडाय ऑक्साइड वायूची गळती झाली. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. या दुर्घटनेत सुदैवाने जीवितहानी झाली नाही, मात्र वायुगळतीमुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली होती.

# 'इमॅजिको इंडिया'तील १३ कामगारांना न्याय!

## सुमारे ३० लाखांची थकबाकी मिळवून देण्यात यश



**तळोजा : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील तळोजा एमआयडीसी परिसरातील इमॅजिको इंडिया प्रा. लि. कंपनीतील १३ कामगारांना न्याय मिळवून देण्यात यश आले आहे. पनवेल विधानसभा क्षेत्राचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगरसेवक दिनेश खानावकर यांच्या प्रयत्नांतून या कामगारांना कंपनीकडून सुमारे ३० लाख रुपयांची थकबाकी मिळवून देण्यात आली.

कंपनीतील १३ कामगारांच्या वेतन व इतर देयकांचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. या प्रकरणाची दखल घेत नगरसेवक दिनेश खानावकर यांनी संबंधित कामगारांच्या बाजूने सातत्याने पाठपुरावा केला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन व कंपनी व्यवस्थापनाशी चर्चा करून कामगारांना त्यांचे हक्काचे पैसे मिळवून देण्यात यश आले. या निर्णयामुळे १३ कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला असून कामगारांनी समाधान व्यक्त केले आहे.

न्याय मिळाल्यानंतर संबंधित कामगारांनी रविवारी (दि.७) पनवेल येथे जाऊन आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी आमदारांचे आभार व्यक्त करत त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि नगरसेवक दिनेश खानावकर यांच्या प्रयत्नांमुळे न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केली. आमच्या प्रश्नांबाबत लोकप्रतिनिधींनी घेतलेली भूमिका आणि केलेला प्रभावी पाठपुरावा यामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक आधार मिळाल्याचे कामगारांनी सांगितले.

# पेट्रोल, डिझेल, गॅस दरकपातीबाबत केंद्र योग्य वेळी निर्णय घेईल -मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**

युद्धजन्य स्थितीमुळे जगात सर्वच देशांमध्ये पेट्रोल, डिझेल व गॅसचे दर वाढले आहेत, परंतु केंद्र सरकार काळजी घेत आहे. परिस्थिती निवळल्यानंतर पेट्रोल, डिझेल, गॅसची उपलब्धता मोठ्या प्रमाणात असेल. त्यावेळी वाढलेल्या किमती कमी होतील. केंद्र सरकार याबाबत योग्य वेळी योग्य निर्णय घेईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते रविवारी (दि.७) नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



पश्चिम आशियातील तणाव, ऊर्जा पुरवठ्यावर निर्माण झालेले दबाव आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढते इंधनदर यामुळे तेल कंपन्यांवरील आर्थिक ताण वाढला आहे. परिणामी घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, युद्धजन्य परिस्थितीमुळे जगातील एकही देश असा नाही, जिथे पेट्रोल-डिझेल, गॅसचे भाव वाढलेले नाही. इंधनाचे दर सगळीकडे वाढलेले आहेत. निश्चितपणे केंद्र सरकार त्याची चिंता करत आहे. यापूर्वीही जगात इंधनाचे दर वाढल्यावरच देशात दर वाढले आहेत आणि कमी झाल्यावर कमीही झाले आहेत. त्यामुळे योग्य वेळी योग्य निर्णय होईल.

पर्जन्यमानाविषयी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले की, मी याआधीही सांगितलंय हे अल निनोचे वर्ष आहे. पाऊस कमी असला तरी कमीत कमी नुकसान होईल असा प्रयत्न चालला आहे. दुबार पेरणीचे संकट येऊ नये म्हणून मार्गदर्शन करण्यात येत आहे, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना पेरणीची घाई न करण्याचे आवाहन केले.

### इथेनॉलचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्राला

*सर्वाधिक इथेनॉलची निर्मिती महाराष्ट्रात होत आहे. त्यामुळे इथेनॉलचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्राला व येथील शेतकऱ्यांना होणार आहे. केंद्र सरकार फ्यूएल ब्लेंडिंगसह १०० टक्के इथेनॉलवरील गाड्यांना प्रोत्साहन देत आहे. याचा लाभ महाराष्ट्राला होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. सध्या भारतात पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळले जात आहे. याला ई-२० असे संबोधले जाते. आता सरकार हे प्रमाण २५ ते ३० टक्क्यांपर्यंत नेण्याचा विचार करत आहे तसेच भविष्यातील गरजा लक्षात घेऊन ई-८५ (८५% इथेनॉल)सारखे इंधनही बाजारात आणत असल्याचेही ते म्हणाले.*

राज्यात 'नो टॉलरन्स फॉर ड्रग्ज' अशी मोहीम सुरू आहे. कुठल्याही स्थितीत ड्रग्जविक्रीची पाळेमुळे खोदून काढण्याचा संकल्प केला आहे. पुढचे काही दिवस ही कारवाई सुरूच राहील, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

भावपूर्ण श्रद्धांजली
जगी ऐसा बाप व्हावा । ज्याचा वंश मुक्तीस जावा ॥



स्व. कान्हाशेठ हरी ठाकूर

बुधवार दि. ०३/०६/२०२६ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७४ व्या वर्षी श्री माऊली चरणी विलीन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरंतर शांती लाभो हिच माऊली चरणी प्रार्थना!
तुका म्हणे पावठणी । करू स्वर्गाची निशाणी ।।

| वार | दिनांक | भजन मंडळाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| सोमवार | ०८/०६/२०२६ | श्री शारदा भजन मंडळ - विचूंबे, बुवा - श्री दिलीप म्हात्रे, पखवाज - हिरामण पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| मंगळवार | ०९/०६/२०२६ | जय मल्हार प्रासादिक भजन मंडळ - तरघर बुवा- श्री. रूपेश मढवी, श्री. सिद्धेश पाटील, पखवाज - सागर मढवी, किरण ओवळेकर | सायं. ७ ते ८.३० वा. |
| बुधवार | १०/०६/२०२६ | श्री. दत्त प्रासादिक भजन मंडळ - कोपर बुवा - ह.भ.प. वसंतशेठ पाटील, पखवाज - वैष्णव देशमुख | सायं. ७ ते ८.३० वा. |
| गुरूवार | ११/०६/२०२६ | श्री. नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ - कोपरा गायिका - सौ. शिवमाला पाटील, पखवाज- निलेश पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| शुक्रवार | १२/०६/२०२६ | दत्त प्रासादिक भजन मंडळ - आदई बुवा - श्री. गणपत म्हात्रे, पखवाज - चेतन पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| शनिवार | १३/०६/२०२६ | नादब्रम्ह साधना मंडळ - खारघर गुरूवर्य श्री.निवृत्ती बुवा चौधरी, पखवाज - निलेश पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| रविवार | १४/०६/२०२६ | हनुमान प्रासादिक भजन मंडळ - पडघे संगीत रत्न श्री. शंकुनाथ बुवा पडघेकर, पखवाज - किशोर पाटील, चालक - पांडुशेठ भोईर | सायं. ७ ते ८.३० वा. |

सोमवार | १५/०६/२०२६

हरि किर्तन
सकाळी -१०:०० ते १२:००
किर्तनकार -ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक,
पखवाज साथ - श्री. सुधीर भाऊ कराळे,
तबला साथ - श्री. दिगंबर गायकर,
सहगायक -श्री. अनिल यशवंतराव,
श्री हर्षल घुढे,
सिंथेसाईझर - श्री. दर्शन वाघचौडे





* किर्तनकार *
ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक

शोकाकुल - समस्त ठाकूर परिवार

टिप - कोणत्याही प्रकारचे दुःखवटे स्वीकारले जाणार नाहीत.

# राज्यात मानसिक आरोग्य सेवांचे जाळे अधिक मजबूत करणार -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये 'उडान' प्रकल्पांतर्गत मानसिक आरोग्य सेवा अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने सार्वजनिक आरोग्य विभाग आणि दोन स्वयंसेवी संस्थांमध्ये पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यास मंजुरी दिली आहे.




राज्य शासनाच्या निर्णयानुसार, ग्रामीण आदिवासी समाज विकास संस्था, सौसर (मध्य प्रदेश) आणि अन्यथा फाउंडेशन या संस्थांच्या सहकार्याने जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. हा करार १ ऑगस्ट २०२६ ते ३१ जुलै २०३१ या कालावधीसाठी लागू राहणार असून, तो पूर्णपणे गैरवित्तीय स्वरूपाचा असल्याने राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

राज्यात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत्या प्रमाणात समोर येत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि मेंदू विज्ञान संस्थेच्या सर्वेक्षणानुसार देशातील सुमारे १० ते १४ टक्के प्रौढ व्यक्तींना मानसिक आरोग्याचे विकार आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या लक्षात घेता सुमारे १.२ ते १.८ कोटी नागरिक मानसिक समस्यांशी झुंज देत असल्याचे या सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देत मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा अधिक परिणामकारकपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी 'उडान' प्रकल्पाचा विस्तार करण्यात येत आहे.

या प्रकल्पांतर्गत गावपातळीवर मानसिक आरोग्य जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून ग्रामपंचायत, बचत गट, युवक गट यांचा सहभाग वाढविला जाणार आहे; तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, मनुष्यबळ प्रशिक्षण, मातृ मानसिक आरोग्य कार्यक्रम राबविणे, तसेच सौम्य आणि मध्यम स्वरूपाच्या रुग्णांना मानसोपचार व समुपदेशन सेवा देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

याआधी नागपूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या 'उडान' प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर आता वर्धा जिल्ह्यातही हा कार्यक्रम विस्तारित करण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना मानसिक आरोग्य उपचार आणि समुपदेशन सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने या करारासाठी आरोग्य सेवा संचालकांना अधिकृत केले असून, मानसिक आरोग्य क्षेत्रात शासन आणि स्वयंसेवी संस्थांमधील समन्वयातून राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न आहे.

# महापारेषणचा २१वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**मुंबई : प्रतिनिधी**

महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २० वर्षात चांगले काम केले आहे, पण आता ऊर्जा संक्रमणामध्ये राईट ऑफ वे (RoW), हवामान बदल आणि अक्षय ऊर्जेसाठी काम करावे लागणार आहे. यासाठी अधिकाऱ्यांनी सुनियोजन करून अंमलबजावणी केल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण होतील.``, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी केले.



वांद्रे येथील प्रकाशगंगा इमारतीत महापारेषणचा २१ वा वर्धापनदिन दूरदृश्य प्रणालीव्दारे उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात डॉ. संजीव कुमार बोलत होते. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. दत्तात्रय पडळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, कार्यकारी संचालक (राज्य भार प्रेषण केंद्र) श्री. शशांक जेवळीकर, अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने उपस्थित होते.

सुरूवातीला मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी महापारेषणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिलेल्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले.

यावेळी ऊन-पावसाची तमा न बाळगता विशेष कामगिरी केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पारितोषिके घोषित करून गौरविण्यात आले.या सोहळ्याला राज्यातील विविध परिमंडलातील सुमारे साडेपाच हजार अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय दूरदृश्य प्रणालीव्दारे व ऑनलाईन उपस्थित होते.

# काल काय झाले ते सारे विसरून मित्रपक्षांसोबत भविष्यातील वाटचाल करणार

### खासदार सुनील तटकरे यांचे प्रतिपादन

**रोहा : प्रतिनिधी**

काल काय झालं त्याच्यापेक्षा सारे विसरून जाऊ. उद्याचा उषकाल उद्याचा भविष्य एका बाजूला पक्ष म्हणून पक्षाचा संघटन उभं करणार. तिन्ही जिल्ह्यामध्ये पक्षाला मानणाऱ्या मतदारांना वेगवेगळ्या विकासाच्या कामाच्या माध्यमातून अधिक न्याय त्या ठिकाणी देणार. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना राबविणार. महायुती म्हणून आपण काम करत असताना आघाडीचा धर्म पालन करत असतानाच आपल्या स्तरावरती पक्षाच्या कार्यकर्त्यांचा विचार सोबत घेत त्यांच्याही अस्तित्वाला कुठेही कमीपणा येणार नाही.याचे भान ठेवत मित्र पक्षांच्या सोबत सुद्धा उद्या भवितव्याची वाटचाल त्या ठिकाणी करायचे आहे. जमिनीवरती पाय ठेवतच अशा पद्धतीने आपण काम करण्याचा नक्कीच प्रयत्न करु, असे खासदार सुनील तटकरे यांनी सांगत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांचे आभार मानले.



आपल्या सर्वांचे आयुष्यभराची पुण्याई, मिळालेली साथ यांच्या बळावरती अभुतपुर्व यश संपादित करू शकलो. मागील काळात प्रचंड पद्धतीने अपमानास्पद पराकुटीची टीका, कधी खालच्या पातळीवरची टीका, कधी जे घडलं नाही त्या बाबत वावडया उठवण्याचे काम, इतक्या प्रचंड प्रमाणात केले त्याच्यामुळे एका बाजूला मनस्ताप होत होता. परंतु निवडणुकीनंतर अनेक कंगारे निर्माण होत गेले.

आयुष्यभर नेमकं काय कमावलं, किती वेळा पदावर गेलो, किती वेळा मंत्री झालो. तरी पण आयुष्यभरामध्ये अहंकार मनाला शिवुन घेतला नाही.आपल्याकडे १० टक्क्यांच्या आसपास संख्याबळ असताना महायुती व महाविकास आघाडी ही लढत होईल असं वाटलं. निवडणुकीची तयारी चालु होती. राजकारण बदलत होतं अर्ज मागे घेण्याच्या दिवशी सकाळी हालचाली झाल्या आपण बिनविरोध यश संपादन करू शकलो.हा महाराष्ट्रात स्पष्ट संदेश देण्यात यशस्वी झालो.

सुतारवाडी येथे आयोजित कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात खा.सुनील तटकरे बोलत होते.यावेळी ना.आदीती तटकरे, नवनिर्वाचित आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, अमित नाईक, जिल्हाध्यक्षा उमा मुंढे, संतोष बैलमारे, हनुमंत जगताप, मंगेश दांडेकर, नंदकुमार म्हात्रे, सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, गट नेते महेंद्र गुजर, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, तालुका कार्याध्यक्ष समिर शेडगे, निधी जाधव, महेश कोलाटकर, मयुर दिवेकर, शिवराम शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी ना.आदिती तटकरे यांनी ही पहिलीच निवडणूक असेल पाच दिवसात चालू झाली आणि संपली. खा. सुनील तटकरे यांच्यावरील विश्वास आम्हाला या निवडणुकीत पाहायला मिळाला. पहिल्यांदाच अपेक्षा पलीकडील यश मिळाले. भाई बिनविरोध निवडून आले. खा. सुनील तटकरे यांचे चमत्कारिक नेतृत्व असल्याचे या निवडणुकीत दिसून आले.

आ.अनिकेत तटकरे मी अंतकरणापासून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण, रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत, सिंधुदुर्गाचे पालकमंत्री नितेश राणे, आदरणीय नारायणराव राणे, ना.भरतशेठ गोगावले, सर्व आमदार खासदार, या सर्वांचे आभार व्यक्त करतो.

त्यांनी या पूर्ण प्रक्रियेमध्ये भरभक्कमपणाने साथ त्या ठिकाणी दिली.सर्वांची साथ मला लाभली, नेते मंडळी व कार्यकर्ते यांनी सहकार्य केले त्यांचे मी आभार मानतो. आमदारकीच्या पहिल्या कालखंडानंतर दुसरा कालखंडात आपल्या सर्वांना अभिप्रेत असलेले काम मी करणार आहे. आता लवकरच खारघर ते सिंधुदुर्ग पर्यंत म्हणजे गोव्याच्या टोकापर्यंत सर्व कार्यकर्त्यांच्या भेटी गाटी घेणार असल्याचे यावेळी आवर्जून आमदार अनिकेत तटकरे यांनी सांगितले.

यावेळी नवनिर्वाचित आमदार अनिकेत तटकरे यांना शुभेच्छा देण्यासाठी कोकणातून मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते सुतारवाडी येथे दाखल झाले होते.

## मराठीच्या गोडव्याने जुळताहेत मनांचे धागे!

# अमराठी चालकांचा व्यवहारिक मराठी शिकण्याकडे उत्स्फूर्त कल -मंत्री सरनाईक

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या मातृभाषेचा सन्मान राखत आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व आत्मीय करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या अमराठी चालकांसाठीच्या व्यवहारिक मराठी शिकवणी वर्गांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मराठी भाषा शिकण्यासाठी अमराठी चालकांमध्ये दिसून येणारा उत्साह खरोखरच वाखाणण्याजोगा आहे, असे गौरवोद्गार परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी काढले.



परिवहन विभागाच्या पुढाकारातून आणि कोकण मराठी साहित्य परिषद तसेच मुंबई साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १ जूनपासून मुंबई महानगर क्षेत्रात अमराठी चालकांसाठी व्यवहारिक मराठीचे विशेष वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या उपक्रमासाठी तब्बल साडेचार हजारांहून अधिक शिक्षकांची फळी उपलब्ध करून देण्यात आली असून, अनेक रिक्षा व टॅक्सी संघटनांनीही सामाजिक बांधिलकी जपत या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

शहरातील विविध भागांमध्ये चालकांच्या सोयीच्या वेळेनुसार वर्गांचे आयोजन करण्यात येत असून, या वर्गांमध्ये चालक स्वयंस्फूर्तीने उपस्थित राहून मराठी भाषेतील दैनंदिन संवाद, व्यवहारातील शब्दप्रयोग आणि प्रवाशांशी सुसंवाद साधण्याची कला आत्मसात करत आहेत. मराठी शिकण्याची त्यांची तळमळ आणि जिद्द ही महाराष्ट्राच्या भाषिक ऐक्याचे सुंदर प्रतीक ठरत आहे.

येत्या १५ ऑगस्टपर्यंत अमराठी चालकांना व्यवहारिक मराठी शिकणे अनिवार्य करण्यात आले आहे. मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या निर्देशानुसार १६ ऑगस्ट पासून प्रवाशांशी मराठीत संवाद साधून न शकणाऱ्या चालकांना परिवहन विभागाच्या कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. अर्थात , या निर्णयाचे महत्त्व ओळखून विविध चालक-मालक संघटनांनी स्वतःहून पुढाकार घेत प्रशिक्षण वर्गांचे आयोजन सुरू केले आहे. शासन, साहित्य संस्था आणि वाहतूक क्षेत्रातील संघटना यांच्या समन्वयातून हे अभियान आता एका व्यापक लोकचळवळीचे स्वरूप धारण करत आहे.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, "मराठी ही केवळ भाषा नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, अस्मितेचा आणि माणुसकीच्या नात्यांचा सेतू आहे. अमराठी चालकांनी मराठी शिकण्यासाठी दाखविलेला उत्साह हा स्वागतार्ह असून, यामुळे प्रवासी आणि चालक यांच्यातील संवाद अधिक स्नेहपूर्ण, सुसंवादी आणि विश्वासार्ह होईल. मराठीचा गोडवा सर्वांच्या ओठांवर आणि व्यवहारात यावा, हीच या उपक्रमामागची प्रेरणा आहे."

मराठी भाषेच्या संवर्धनाबरोबरच सामाजिक सलोखा आणि परस्पर संवादाची नवी दारे खुली करणारा हा उपक्रम राज्याच्या भाषिक एकात्मतेचा एक प्रेरणादायी अध्याय ठरत असल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

# अनिकेत तटकरेंच्या बिनविरोध निवडीने खारपाडा येथे जल्लोष

**पेण : प्रतिनिधी**

कोकण विधान परिषद निवडणुकीमध्ये अनिकेत तटकरे यांची आमदारपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल खारपाडा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कै मोरेश्वर भगत शैक्षणिक सामाजिक विकास संस्थेच्या कार्यालयासमोर जल्लोष केला. यावेळी पेण तालुका व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी फटाके आतषबाजी करीत व अनिकेत भाई तुम आगे बढो, हम आपके साथ है अशा घोषणा देत जल्लोष साजरा केला.



यावेळी खारपाडा येथे तालुका अध्यक्ष दयानंद भगत, माजी सरपंच रश्मी भगत, दिव्यांग प्रहार संघटना अध्यक्ष भालचंद्र भगत, ज्येष्ठ नेते कृष्णा ठाकूर, ज्येष्ठ नेते दत्ता जाधव, माजी उपसरपंच नितेश घरत, पेण विधानसभा महिला चिटणीस ललिता ठाकूर, तालुका महिला उपाध्यक्ष सुनीता घरत, खारपाडा महिला अध्यक्ष मालती म्हात्रे, युवती अध्यक्ष मेघा पाटील, ठाकूर पाडा महिला अध्यक्ष कुंदा ठाकूर तसेच पेण येथे तालुका अध्यक्ष दयानंद भगत शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर जिल्हा वकील सेलअध्यक्ष मंगेश नेने, महिला अध्यक्ष सुनीता चव्हाण नगरापालिका सभापती आनंद जाधव आदी पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# कोकणासाठी १४ जून रोजी मुंबई ते मडगाव विशेष रेल्वेगाडी

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे उन्हाळ्याच्या हंगामात प्रवाशांच्या मागणीनुसार १४ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ते मडगावदरम्यान एकमार्गी विशेष गाडी चालविण्यात येणार आहे. याचा लाभ कोकणातील प्रवाशांनी घ्यावे असे आवाहन मध्य रेल्वेकांना करण्यात आले आहे.

१४ जून रोजी चालविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मडगाव एकमार्गी विशेष गाडी क्रमांक ०११७३ विशेष गाडी दिनांक १४.०६.२०२६ (रविवार) रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी ११.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी (मध्यरात्री) ०१.३० वाजता मडगावला पोहोचेल.



या गाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, अरावली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवि आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत.या गाडीची संरचना ३ वातानुकूलित चेअर कार, १० द्वितीय चेअर कार (६ आरक्षित आणि ४ अनारक्षित), १ द्वितीय आसनासह गाड्र्स ब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर कार अशी आहे.

# चौक-कर्जत मार्गावर अपघात; चौघे जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

चौक कर्जत राज्यमार्गावर रविवारी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास दोन कार एकमेकावर धडकून झालेल्या अपघातात प्रकाश विठ्ठल सोनावळे वय ४९, पल्लवी प्रकाश सोनावळे व ४३ प्रकाश सोनावळे वय २३ वेदांत प्रकाश सोनावणे वय १५ रा.बदलापूर जखमी झाले आहेत. रविवारी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास भिलवले गावानजीक वळणावर दोन कार एकमेकावर आढळून अपघाताची घटना घडली.



अपघाताची माहिती चौक पोलीस दुरुक्षेत्र यांना समजल्यानंतर तातडीने घटनास्थळी पोहोचले जखमी ना पनवेल येथील रुग्णालयात उपचार करता दाखल करण्यात आले आहे.

# ग्रामीण भागात आजही जाते, पाटा-वरवंटा, बाजल्याचा होतोय वापर

**तळा : प्रतिनिधी**

युध्द परिस्थिती व इंधन वाढीमुळे सध्या चुलीला मागणी वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.आजच्या आधुनिक युगात माणसाने मोठी प्रगती केली आहे.या प्रगतीमध्ये अनेक गोष्टीं दुरापास्त होऊन नवनवितंत्र असलेल्या वस्तू वापरण्याकडे अधिक कल असल्याचे पहावयास मिळत आहे.



त्यातच विज्ञान व आरोग्याच्या दृष्टीने योग्य व थोडी मेहनत करून कराव्या लागतात अशा जात,पाटे,बाजला(कॉट) या गोष्टी आज नवनवीन तंत्रज्ञान आल्याने दुरापास्त होत चालल्या असल्या तरी ग्रामीण भागात आजही या वस्तूंचा वापर काही नागरिक करताना दिसत आहेत.

हे गावातील चित्र प्रत्यक्ष दर्शनी पाहिल्या नंतर या वस्तू एकाच घराच्या समोर पहावयास मिळाल्या व त्याचा वापर चांगल्या प्रकारे होत असल्याचे पहावयास मिळाले, या दुरापास्त होत असलेल्या वस्तूंची जागा मिक्सर, चक्की,घरघंटी,बेड,यांनी घेतली आहे.व त्या वस्तूंची बाजारात मागणीही मोठ्या प्रमाणात आहे.त्यात विजेवरती व लवकर काम होऊन वेळ लागत नाही.वेळेची बचत होत असल्याने मागणी अधिक आहे.

हे जरी खर असलं तरी जात्यावरचे दळण व त्यावेळी सकाळच्या प्रहरी गायल्या जाणाऱ्या ओव्या या एक गावातील नागरिकांना सकाळी जात्यांवरील गाणी ऐकूण मनप्रसन्न वआनंदी होत असे.मानसिकता चांगली राहून प्रसन्नता राहत असे त्याच बरोबर हे जात्यावरचे दळण पिठ सकस तसेच पाट्यावरचे वाटण हे चवीला चांगलेच असते .

अशा आरोग्याला पोषक असे असते.आता हे सर्व दुरापास्त होत असले तरी आता एक नवीन काही गोष्टी पहावयास मिळत आहेत त्या अशा की पाट्यावरच्या वाटणाचे ,व जात्यावरच्या दळणाच्या भाकरीच्या पिठाचे जेवण अशा प्रकारचे एक जेवणाचे भाग पुढेपुढे येताना दिसत आहे.

# कामोठ्यात दूषित पाणीपुरवठा

## ◆ नगरसेवक विकास घरत यांनी वेधले प्रशासनाचे लक्ष

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे परिसरात सिडकोकडून होणाऱ्या दूषित व गढूळ पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक विकास घरत यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने पनवेल महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



पनवेल महानगरपालिकेचे विभागप्रमुख, पाणीपुरवठा विभागाचे विलास चव्हाण यांची नगरसेवक विकास घरत, रवींद्र जोशी, प्रदीप भगत, नगरसेविका हेमलता गोवारी, कुसुम म्हात्रे तसेच समाजसेवक भाऊ भगत यांनी भेट घेतली. कामोठे परिसरातील अनेक भागांमध्ये दूषित व गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी प्राप्त होत असून त्याची तातडीने दखल घेणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या या गंभीर विषयावर पनवेल महानगरपालिकेने सिडकोसोबत समन्वय साधून अधिक प्रभावी नियंत्रण व देखरेख ठेवावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच पाण्याच्या गुणवत्तेची नियमित तपासणी, नमुने चाचणी व संबंधित विभागांशी समन्वय साधून तातडीने उपाययोजना राबविण्याची विनंती करण्यात आली. कामोठेकरांना स्वच्छ, सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही आणि या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, असे घरत यांनी यावेळी सांगितले.

# नगरसेवक दशरथ म्हात्रे यांच्या पुढाकाराने ज्येष्ठ नागरिकांना छत्रीवाटप

**पनवेल : वार्ताहर**



पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने खांदा कॉलनी येथील खांदेश्वर परिसरात ज्येष्ठ नागरिकांसाठी छत्रीवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीचा विचार करून नगरसेवक दशरथ म्हात्रे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला महापौर नितीन पाटील, खांदा कॉलनीचे नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप युनियन लीडर मोतीराम कोळी, भाजप नेते मुंडे, उद्योजक सुरेश म्हात्रे, बिल्डर संजय पाटील, प्रसन्ना, जयंती प्रसन्ना, गोपीनाथ मुंडे, आशा मुंडे, प्रमोद भोईर, रामनाथ पाटील, सुभाष गावडे, दत्ता कुळकर्णी, महेंद्र कांबळे, प्रकाश जाधव, अनिल पालवे, शिवाजी खताळ, आझाद ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष कृष्णा पाटील, ज्येष्ठ नागरिक कट्टा ग्रुप, उपनगराध्यक्ष गणेश पाटील, संजय कांबळे, प्रवीण भोसले, सचिन गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. खांदेश्वर मंदिर परिसर हा खांदा कॉलनीतील ज्येष्ठ नागरिकांसाठी एक महत्त्वाचे केंद्र मानले जाते. दररोज सकाळी येथे शेकडो ज्येष्ठ नागरिक योगाभ्यास, व्यायाम आणि प्रातःभ्रमणासाठी एकत्र येतात. तसेच विविध महिला संघटनांतील ज्येष्ठ महिलांनीही या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे परिसरातील नियमितपणे मंदिर परिसरात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

# १०२ बटालियन शीघ्र कृती दलाकडून पर्यावरणदिनी वृक्षारोपण

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून खारघर येथील १०२ बटालियन शीघ्र कृती दलातर्फे वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी जवानांनी लावलेल्या रोपांची काळजी घेण्याचा संकल्प केला. जागतिक पर्यावरण दिनी पर्यावरणपूरक जीवनशैली आणि हरित भविष्यासाठी बांधिलकी व्यक्त करत यंदाच्या संकल्पनेनुसार प्रदूषण कमी करण्यावर, नैसर्गिक संसाधनांचे जतन करण्यावर आणि शाश्वत जीवनशैलीचा प्रसार करण्यावर विशेष भर देण्यात आला.

यावेळी १०२ बटालियन आरएएफ कमांडंट, अधिकारी आणि जवानांनी उत्साहाने वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेत अनेक वृक्षरोपांची लागवड केली. जैवविविधतेचा ऱ्हास आणि वाढते प्रदूषण या गंभीर पर्यावरणीय आव्हानांवर मात करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. प्लास्टिकचा वापर कमी करणे, पाणी आणि ऊर्जेची बचत करणे तसेच



पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे, काळाची गरज आहे, असे मनोगत कमांडर सुशांत कुमार प्रधान यांनी व्यक्त केले.

जागतिक पर्यावरण दिन पृथ्वीच्या संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाची जबाबदारी अधोरेखित करणारा दिवस असून १०२ बटालियन आरएएफतर्फे स्वच्छ, हिरवेगार आणि निरोगी पर्यावरण निर्मितीसाठी आपली कटिबद्धता पुन्हा एकदा व्यक्त करण्यात आली.

# तक्का येथे एक पेड माँ के नाम अभियानांतर्गत अल्पसंख्याक मोर्चातर्फे फळझाडांची लागवड

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पक्ष अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीने तक्का परिसरातील हजरत पीर जमाल शाह बाबा दर्गा कब्रस्तानमध्ये फळझाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. सय्यद अकबर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात मदरशातील लहान मुलांसह अनेक मान्यवर सहभागी झाले होते. भारतीय जनता पक्षाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त देशभरात वृक्षारोपण अभियान साजरे केले गेले.



'एक पेड माँ के नाम'शीर्षकाखाली राबविलेल्या अभियानामध्ये अल्पसंख्याक समाजाने हिरीरीने सहभाग घेतला. भाजप अल्पसंख्याक मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा कोकण प्रदेश सहसंयोजक सय्यद अकबर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या कार्यक्रमात अल्पसंख्याक बांधवांनी जागोजागी फळझाडांचे रोपण करत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील तक्का परिसरामध्ये हे अभियान राबविण्यात आले. दर्गा परिसरातील कब्रस्तानमध्ये सीताफळ, पेरू, जांभूळ यासारख्या फळझाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. मदरशामध्ये शिकत असणाऱ्या लहान मुलांनी अभियानामध्ये सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाला महानगरपालिका सभागृह नेते प्रकाश बिनेदार, कोकण सहसंयोजक सय्यद अकबर, नगरसेवक अजय बहिरा, मौलाना नईम शेख, दर्ग्याचे विश्वस्त सिझान जावेद फकीर मुजावर, अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश सदस्य साबीर शेख, राहुल बोर्डे, मुदस्सर पटेल, आफताब ताडे, अयुब पठाण, असिफ काझी उपस्थित होते. मौलाना नईम शेख यांनी सांगितले की, अल्लाह यांनी आपल्याला नेहमीच वृक्षारोपणाची शिकवण दिली आहे. भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे काम कौतुकास्पद आहे. नगरसेवक अजय बहिरा यांनी सांगितले की, कोरोनाचा वाईट कालखंड सगळ्यांनी पाहिला. म्हणून आपण झाडे लावली पाहिजेत. सय्यद अकबर म्हणाले की, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त देशभरात लाखो वृक्षांचे रोपण केले जाणार आहे.

सभागृह नेते प्रकाश बिनेदार म्हणाले की, सय्यद अकबर यांच्या नेतृत्वाखाली एका उत्तमरीत्या आयोजित कार्यक्रमाचा साक्षीदार झाल्याचे सौभाग्य मला प्राप्त झाले. पनवेल पालिकेच्या वतीने पाच विभागांमध्ये वृक्षारोपणाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. मागच्या वर्षी पनवेल महापालिकेने ५३ हजार वृक्षांचे रोपण केले. यावर्षी आम्ही एक लाख वृक्षरोपण करू, असा विश्वास महापौर नितीन पाटील यांनी व्यक्त केला आहे. नुकतेच राज्याच्या अल्पसंख्यांक आयोगाच्या उपाध्यक्षांनी पनवेल पालिकेला भेट दिली. आम्ही करत असलेल्या कार्याबद्दल त्यांनी आमच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली.

# पर्यावरण संवर्धनासाठी डिजिटल पाऊल; 'पर्यावरण छायाचित्र डायरेक्टरी'चे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून इन्फिनिटी फाउंडेशन आणि माय युवा भारत रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फोटोग्राफी स्पर्धेला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेसाठी २४०हून अधिक प्रवेशिका प्राप्त झाल्या. स्पर्धेतील छायाचित्रांचे संकलन करून तयार केलेल्या पर्यावरण छायाचित्र डायरेक्टरी संकेतस्थळाचे उद्घाटन माय युवा भारत महाराष्ट्रचे स्टेट डायरेक्टर अमित पुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.



या स्पर्धेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक व्यापक पातळीवर पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्पर्धेत प्राप्त झालेल्या छायाचित्रांचे संकलन करून एक अभिनव ऑनलाइन पर्यावरण डायरेक्टरी संकेतस्थळ विकसित करण्यात आले. या संकेतस्थळाचे उद्घाटन माय युवा भारत महाराष्ट्रचे स्टेट डायरेक्टर अमित पुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. पर्यावरण क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था, स्वयंसेवक, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे.

यावेळी बोलताना अमित पुंडे यांनी पर्यावरण संरक्षणासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. पर्यावरण जनजागृतीसाठी डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून राबविण्यात आलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून अशा उपक्रमांमुळे पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक होण्यास मदत होईल, असे नमूद केले.

पर्यावरण छायाचित्र डायरेक्टरी संकेतस्थळाची संकल्पना व निर्मिती युवा नीती ॲम्बेसेडर सचिन दुम्बरे यांनी केली आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या छायाचित्रकारांनी निसर्ग सौंदर्य, जैवविविधता, जलसंवर्धन, वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षणाशी संबंधित विविध पैलू छायाचित्रांमधून प्रभावीपणे मांडले.

या कार्यक्रमाला इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला, उपाध्यक्ष वेदांतिका जाधव, महासचिव यश दुबे, महासचिव प्रणय उसाटकर, सहसचिव रेश्मा कुट्टी, सांस्कृतिक विभाग सचिव अरबाज खान, सल्लागार पुरणसिंग तसेच फाउंडेशनचे इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमास माय युवा भारत रायगडचे विशेष सहकार्य लाभले. फोटोग्राफी स्पर्धेचा अंतिम निकाल १५ जून रोजी पर्यावरण छायाचित्र डायरेक्टरीच्या www.env.infinityfoundation.co या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे. स्पर्धकांनी तसेच नागरिकांनी संकेतस्थळाला भेट देऊन पर्यावरणविषयक माहितीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ५१ वर्षांनंतर भेटले शाळकरी मित्र; अभ्युदय शाळेच्या मित्रांचा स्नेहमेळावा

**पनवेल : वार्ताहर**

मुंबईतील काळाचौकी येथील अभ्युदय म्युनिसिपल सेकंडरी हायस्कूलमधील १९७४-७५ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल ५१ वर्षांनंतर एकत्र येत नेरे येथील फार्महाऊस रिसॉर्टमध्ये दोन दिवसीय स्नेहमेळावा साजरा केला. जुन्या आठवणींना उजाळा देत मैत्रीचा अनोखा उत्सव रंगला. या स्नेहमेळाव्यात सुमारे १८ माजी विद्यार्थी सहभागी झाले होते.



वयाच्या ६९ ते ७० वर्षांच्या उंबरठ्यावर असलेल्या या मित्रांनी शालेय जीवनातील आठवणी, गमतीजमती, शिक्षकांचे स्मरण आणि जुन्या मित्रांसोबतच्या गप्पांमुळे भावूक क्षण अनुभवले. स्नेहमेळाव्यात सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान कराओकेवर अनेक मित्रांनी गाणी सादर केली. गप्पा, हास्यविनोद आणि आठवणींच्या ओघात भूक-तहानही विसरल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे दोन मित्र रत्नागिरी येथून खास या स्नेहमेळाव्यासाठी उपस्थित राहिले होते.

मैत्रीच्या ५१ वर्षांच्या प्रवासाचे प्रतीक म्हणून विशेष केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी चहा-बिस्किटांचा आस्वाद घेत पुन्हा भेटण्याचा निर्धार करत परतीचा प्रवास सुरू केला. या स्नेहमेळाव्याच्या आयोजनात प्रदीप चिंदरकर, अनिल शिळकर, सतीश तावडे, मनोहर दळवी आणि प्रमोद खानोलकर यांनी विशेष पुढाकार घेतला. शालेय जीवनातील निखळ मैत्रीचे बंध काळाच्या ओघातही अधिक दृढ होत असल्याचे या स्नेहमेळाव्यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

# पर्यावरणदिनी पनवेल परिसरात १२ शैक्षणिक संस्थांमध्ये वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून 'माझी वसुंधरा ७.०' अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये शुक्रवारी (दि. ५) वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्रात वाढ आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमांतर्गत डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, न्यू पनवेल, शांतीनिकेतन पब्लिक स्कूल, न्यू पनवेल, के.एल.ई. कॉलेज, कळंबोली, एम.जी.एम. महाविद्यालय, कळंबोली, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे, लोकनेते इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे, सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, खारघर, रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर, आयटीएम स्किल युनिव्हर्सिटी, खारघर तसेच गोखले स्कूल, खारघर येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी तसेच महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध प्रकारच्या झाडांची रोपे लावली.

वृक्षसंवर्धनाचे महत्त्व, पर्यावरण संरक्षणाची गरज आणि भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचे महत्त्व याबाबत उपस्थितांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. पनवेल महानगरपालिका पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असून 'माझी वसुंधरा ७.०' अभियानाच्या माध्यमातून शहर अधिक हिरवेगार, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे उपायुक्त स्वरूप खासगी यांनी सांगितले.



# महापौरांच्या उपस्थितीत आनंदी ग्रुपच्या सदस्यांचे वाढदिवस साजरे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीतील आनंदी ग्रुपच्या वतीने १ ते ७ जूनदरम्यान वाढदिवस असणाऱ्या सदस्यांचा सामूहिक वाढदिवस सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महापौर नितीन पाटील उपस्थित होते. यावेळी खांडेश्वर मंदिर परिसराच्या सुशोभीकरणाचे आश्वासन महापौरांनी दिले.

पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्या उपस्थितीत आनंदी ग्रुपच्या अंतर्गत सर्व ग्रुपच्या वतीने दिनांक १ ते ७ जूनदरम्यान असलेल्या सदस्यांचा सामूहिक वाढदिवस साजरा करण्यात आला. १० दिवस अगोदर ठरल्याप्रमाणे आनंदी ग्रुपच्या सर्वांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी महापौर नितीन पाटील यांनी आनंदी ग्रुपला व सर्व सदस्यांना शुभेच्छा दिल्या. खांडेश्वर मंदिर व परिसरातील कोणतीही अडचण दूर करण्यात येईल. तसेच तलाव व परिसराचे सुशोभीकरण सिडकोकडून हस्तांतर झाल्यानंतर त्वरित हाती घेण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

याचबरोबर आनंदी ग्रुपचे सदस्य व खांदा कॉलनीचे नगरसेवक एकनाथ गायकवाड यांनी सदर परिसराला स्वर्गीय संजय भोपी सार्वजनिक उद्यान असे नाव देण्यात यावे, अशी मागणी केली. या मागणीला सर्वांनी टाळ्यांच्या गजरात अनुमोदन दिले. यावेळी प्रास्ताविक व आभार भीमराव पोवार यांनी मानले, तर आनंदी ग्रुपचे महत्त्व महावितरणचे कार्यकारी अभियंता संजय पाटील यांनी सांगितले.

# मांगीर बाबा जत्रेमुळे वातावरण भक्तिमय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील रोहिदास वाडा येथे मांगीर बाबा जत्रा मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडली. या जत्रेला भाविकांची मोठी गर्दी होती.

यावेळी नगरसेविका दर्शना भोईर, यशवंत जाधव, रजनीश जाधव, निकेतन लवंगे, विजय कोळी, गोरख नवळे, निलेश जाधव, अनिरुद्ध जाधव, अनिल उरणकर, प्रतीक गायकवाड, संतोष जाधव, प्रवीण कांबळे, शुभम मोहकर, बाळा कासार, मधुकर उरणकर आदींनी दर्शन घेतले. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.





## संपादकीय

# आशा आणि सावधता

उन्हाच्या कडाक्याने होरपळणाऱ्या महाराष्ट्राला अखेर दिलासा देणारे वृत्त आहे. नैऋत्य मान्सूनने राज्यात प्रवेश केला असून शेतकरी, नागरिक तसेच उद्योगक्षेत्रात नव्या आशा जागृत झाल्या आहेत. दरम्यान, हवामानातील बदल आणि अल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे प्रमाण असमान राहण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. त्यामुळे वरुणराजाने वर्दी दिली असली तरी विशेषतः बळीराजाने सावधपणे पावले उचलणे आवश्यक आहे.


**मान्सून हा केवळ पाऊस नसून तो अर्थकारणाचा, शेतीचा आणि जनजीवनाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे त्याच्या आगमनाकडे दरवर्षी सर्वजण आशेने आणि उत्सुकतेने पाहत असते. यंदाच्या उन्हाळ्यात राज्यातील अनेक भागांनी विक्रमी तापमानाचा सामना केला. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील काही भागांत उष्णतेची तीव्रता मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. परिणामी नागरिक हैराण झाले आहेत, तर अनेक धरणांतील जलसाठेही चिंताजनक पातळीपर्यंत घसरल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत मान्सूनच्या आगमनाने साऱ्यांच्या मनात आशेची नवी पालवी फुटली आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर शेतीवर आधारित आहे आणि खरीप हंगामाचे यश हे पावसावर अवलंबून असते. त्यामुळे मान्सूनच्या पहिल्या सरी पडताच शेतकऱ्यांच्या हालचाली वाढतात. शेतजमिनीची मशागत, बियाणे आणि खतांची सज्ञता तसेच पेरणीची पूर्वतयारी सुरू होते. पाऊस हा केवळ शेतीसाठी आवश्यक घटक नसून तो ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चक्र गतिमान करणारा महत्त्वाचा आधार आहे. यंदाच्या मान्सूनचे आगमन समाधानकारक असले, तरी त्याच्या पुढील वाटचालीबाबत काहीसा संभ्रम कायम आहे. जागतिक हवामानातील बदल आणि अल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे वितरण असमान राहण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. काही भागांत चांगला पाऊस पडेल, तर काही भागांत पावसात खंड पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना पेरणीची घाई न करण्याचे आवाहन केले आहे. पुरेसा आणि सातत्यपूर्ण पाऊस झाल्यानंतरच पेरणीचा निर्णय घ्यावा, असा त्यांचा सल्ला आहे. हा सल्ला अत्यंत महत्त्वाचा आणि दूरदृष्टीचा मानावा लागेल, कारण मान्सूनचे आगमन आणि त्याची सातत्यपूर्ण प्रगती या दोन वेगळ्या बाबी आहेत. अल निनोचा प्रभाव हा जगभरातील हवामान व्यवस्थेवर परिणाम करणारा घटक मानला जातो. त्याचा परिणाम पावसाच्या प्रमाणावर आणि वितरणावर होऊ शकतो, मात्र याचा अर्थ निराश होण्याचे कारण नाही. गेल्या काही वर्षांत भारतीय हवामान खात्याच्या अंदाजांमध्ये मोठी अचूकता आली आहे. राज्य सरकार, कृषी विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा याही पूर्वीपेक्षा अधिक सज्ज आहेत. त्यामुळे संभाव्य आव्हानांना तोंड देण्यासाठी आवश्यक ती तयारी करण्याची संधी उपलब्ध आहे. आज महाराष्ट्र मान्सूनच्या स्वागतासाठी सज्ज झाला आहे, पण या स्वागतासोबत संयम, नियोजन आणि दूरदृष्टी यांचीही आवश्यकता आहे. पाऊस हा निसर्गाचा आशीर्वाद असला, तरी त्याचा अधिकाधिक लाभ मिळवण्यासाठी योग्य व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते. जलयुक्त शिवारसारख्या उपक्रमांमुळे राज्यात जलसंधारणाची चळवळ निर्माण झाली आहे. अनेक गावांनी पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्णतेकडे वाटचाल केली आहे. आता या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्याची गरज आहे. शेतकरी, प्रशासन आणि समाज यांनी एकत्रितपणे पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करण्याचा संकल्प केला पाहिजे, कारण हवामान बदलाच्या युगात पाण्याचे सुयोग्य व्यवस्थापन हीच खरी शाश्वत विकासाची गुरूकिल्ली ठरणार आहे.**

# गायक आणि संगीतकार गजाननराव वाटवे

मराठी भावगीत गायक व संगीतकार गजाननराव वाटवे यांचा जन्म बेळगाव येथे ८ जून १९१७ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचा भिक्षुकीचा व्यवसाय होता आणि ते मिरज संस्थानामध्ये उपाध्याय होते. छोट्या गजाननला लहानपणापासूनच गाण्याची आवड होती आणि उपजत गोड गळ्यामुळे विविधप्रसंगी गाणी म्हणण्यात अग्रेसर असे. आज गजाननराव वाटवे यांचा जन्मदिन आहे.

गाण्याच्या वेडापायी बेळगाव सोडून ते पुणे येथे आले. विनायकबुवा पटवर्धन यांनी गजाननरावांची सोय गोविंदराव देसाई यांच्या गोपाल गायन समाजात केली. गजाननरावांनी अर्थार्जनाकरिता शाळा-महाविद्यालयांमध्ये गायनाचे वर्ग घेण्यास सुरुवात केली. त्यांचा गायनाचा पहिला जाहीर कार्यक्रम फर्ग्युसन महाविद्यालयात झाला (१९३८). यानंतर त्यांनी विविध प्रसंगांना अनुसरून काव्यगायनाचे कार्यक्रम करण्यास सुरुवात केली. त्यांना मुंबई आकाशवाणीवर गायनाचा कार्यक्रम करण्याची संधीही मिळाली (१९३९). याचवर्षी त्यांची 'वारा फोफावला' ही ध्वनिमुद्रिका एच.एम.व्ही.ने काढली. ही पहिलीच ध्वनिमुद्रिका खूप गाजली. यानंतर त्यांच्या अनेक ध्वनिमुद्रिका निघाल्या.

गजाननरावांनी केशवसुत, गिरीश, माधव जुलियन, यशवंत, कुसुमाग्रज, सुरेश भट, गदिमा, राजा बढे, मंगेश पाडगावकर, शांता शेळके, श्रीनिवास खारकर आदी प्रतिभावंतांच्या दर्जेदार भावकविता अत्यंत सुरेल चालीत बांधल्या आणि त्या रसिकांसमोर पेश केल्या. हे त्यांनी केलेले काव्यगायनाचे कार्यक्रम खूप गाजले. या कार्यक्रमांमध्ये ते विविध प्रकारची गीते सादर करत असत. राष्ट्रप्रेमाची गीते, मातृप्रेमाची गीते, प्रेमगीते, पाऊस गीते, विडंबन गीते असे विविध प्रकार या कार्यक्रमात असल्याने सर्व प्रकारच्या रसिकांना हे कार्यक्रम आवडू लागले.



गजाननरावांनी जवळपास २००० पेक्षाही अधिक गीते स्वरबद्ध केली, त्यापैकी त्यांनी संगीतबद्ध केलेल्या व गायलेल्या गीतांमध्ये रामाला गं चंद्र हवा (१९५४), हीच राघवा हीच पैंजणे (१९५४), मंदिरात आलो तुझ्या दर्शनाला (१९८६), झुंजू मुंजू झालं (१९९३), निरांजन पडले तबकात (१९९९), दोन ध्रुवावर दोघे आपण(१९९९), चंद्रावरती दोन गुलाब (१९९९), घट तिचा रिकामा (२००४), प्रीत तुझी माझी (२००६), नयन खेळले जुगार (२०१०), परीसा हो तुलसी रामायण (२०१४) ही गीते विशेष गाजली. तसेच त्यांनी संगीतबद्ध केलेल्या गीतांमध्ये गगनी उगवला सायंतारा, कोणता मानू चंद्रमा, कुंभारासारखा गुरू, ती पहा बापूजींची प्राणज्योती, जारे चंद्रा तुडवित जा पवना जा वेगे, चल चल चंद्रा, घर दिव्यात मंद तरी, गेला दर्यापार घरधनी, गावू त्यांना आरती, कधी कुठे न भेटणार, अंतरीची विशाल स्वप्ने, ऐकलात का हट्ट नवा, उठ राजसा घननिळा, आला स्वप्नांचा मधुमास, रघुवीर आज घरी येणार, या धुंद चांदण्यात तू, नाखवा वल्हव वल्हव, तो सलीम राजपुत्र, ते कसे गं ते कसे, परदेशी सजन घरी आले, सुरांनो जावू नका रे ही गीते रसिकप्रिय झाली. दरम्यान प्रभात फिल्म कंपनीशी त्यांचा संबंध आला आणि दहा वाजता या चित्रपटासाठी त्यांनी पार्श्वगायन केले. अनेक गीतांना त्यांनी चालीही दिल्या. वाटवे यांनी संगीतबद्ध केलेल्या कर्णमधुर कविता मालती पांडे, माणिक वर्मा, सुमन कल्याणपूर, ज्योत्स्ना भोळे, कुमुदिनी पेडणेकर या गायिकांनी गायल्या आहेत.

गजाननरावांचा विवाह सुषमा यांच्याशी झाला. त्यांना मिलिंद वाटवे आणि मंजिरी वाटवे-चुणेकर ही दोन मुले. गजाननरावांनी आपल्या सुरेल गायनाने मराठीतील अर्थघन भावगीतांना वेगळी उंची प्राप्त करून दिली. ते स्वत:ची ओळख काव्यगायक अशी करून देत असत. त्यांनी भावगीत या गायनप्रकाराचा प्रसार केला आणि सुगम संगीताला मैफलीचा दर्जा मिळवून दिला. कवितेला शोभेल अशी भावस्पर्शी चाल आणि तबला व पेटी या वाद्यांच्या जोडीने माफक संगीताचा वापर करून भावपूर्ण मुलायम आवाजात हे गानसादरीकरण होत असे. याचा सर्वसामान्य रसिकांवर वेगळा प्रभाव पडत असे व ते भारावून जात. त्यांचे गायनाचे कार्यक्रम खूप लोकप्रिय असण्याचे हे एक गमक होते. ते कवितेतील शब्दोच्चाराकडेही लक्ष देत असत. यमक साधण्याकरिता कवितेची अकारण मोडतोड त्यांना पटत नसे. कविता भावपूर्ण, श्रवणीय आणि प्रेक्षणीय करण्याची किमया त्यांच्यामध्ये होती. शाळा-महाविद्यालयातील कार्यक्रम, गणपती उत्सव अशा सर्व लहानमोठ्या प्रसंगात त्यांचे काव्यगायनाचे कार्यक्रम होत असत.

गजाननरावांना दीनानाथ पुरस्कार (१९९३), महाराष्ट्र शासनाचा 'लता मंगेशकर पुरस्कार' (१९९४), वसंतराव नाईक पुरस्कार (१९९५), गदिमा प्रतिष्ठानचा पुरस्कार, युगप्रवर्तक पुरस्कार इत्यादी पुरस्कार मिळाले. पुणे येथे १२ डिसेंबर १९६७ रोजी झालेल्या भावगीत गायक संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

गजाननरावांची शिष्य परंपराही मोठी आहे. अनुराधा मराठे, शोभा जोशी, रंजना जोगळेकर, मंजिरी आलेगावकर, रवींद्र साठे इत्यादींनी त्यांचा वारसा पुढे चालविला. गगनी उगवला सायंतारा (१९७१) हे त्यांचे आत्मचरित्र. गजाननरावांनी संगीतबद्ध केलेल्या १०० भावगीतांचा समावेश असलेला निरांजनातील वात हा भावगीतसंग्रह बबनराव नावडीकर यांनी संकलित केला आहे. स्वरानंद प्रतिष्ठान, पुणे ही संस्था वाटवे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भावगीत या गायन प्रकारात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तीस २०१६ पासून पुरस्कार देते. गजाननरावांचे वृद्धापकाळाने पुणे येथे २ एप्रिल २००९ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

# रंगभूमी कलावंत, एकपात्री प्रयोगकार राम नगरकर

मराठी रंगभूमी आणि असंख्य चित्रपटांमधून लाखो रसिकांना खळखळून हसविणारे विनोदी अभिनेते, नाटककार, लेखक कै. राम नगरकर यांचे आज पुण्यस्मरण. त्यांचा जन्म नगर जिल्ह्यातील सारोळा येथे ५ एप्रिल १९३० रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या १५व्या वर्षीच त्यांनी काहीतरी करायचेच या हेतूने शिक्षण सोडून मुंबई गाठली. मुंबई नगरी त्यावेळी चाळ संस्कृतीत सगळ्यांना सामावून घेत होती, आताच्या सारखी संकुल संस्कृती नव्हती. रोजगारासाठी एकटे राहून थकल्या भागल्या जीवांना भजनाने, विनोदाने, वगनाट्याने आनंद मिळायचा. त्या मुंबईतील प्रवाहात नगरकर मिसळून गेले. साधारण १९४५च्या सुमारास ते मुंबईत दाखल झाले.

त्या वेळी स्वातंत्र्याचे रणशिंग वाजत होते. रामभाऊ सेवादलाच्या माध्यमातून चळवळीत उतरले. निळू फुले, पु.ल. देशपांडे अशी अनेक मंडळींच्या सहवासात ते आले.



तेव्हा दादा कोंडके सेवादलात होते. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा'मध्ये दादा कोंडके यांच्याबरोबर त्यांनी काम केले. राम नगरकर हे राष्ट्रसेवा दलाच्या कलापथकात काम करीत असत. त्यांनी तेथे सहज सांगितलेल्या किश्शांचे रूपांतर म्हणजे 'रामनगरी' हे नगरकरांनी लिहिलेले विनोदी आत्मकथापर पुस्तक. महाराष्ट्र शासनासह अनेक संस्थांनी या पुस्तकाला पुरस्कार देऊन गौरविले.

ग्रामीण ढंगातील लोकनाट्य हा प्रकार उच्चभ्रू समाजात नेण्याचे कार्य ज्यांनी केले त्यामध्ये राम नगरकरांचे नाव पहिल्या पंक्तीत घ्यावे लागेल. तमाशा म्हणून नाक मुरडणाऱ्या लोकांना ग्रामीण ईनोद' आणि हिसका' काय असतो याची खरी माहिती झाली राम नगरकरांमुळेच. आत्मकथा लिहिणारे व आत्मकथन मंचावर करणारे ते पहिले ग्रामीण नाटककार होते. ग्रामीण भागातील लोकांचे जीवन, त्यांचे स्वभाव, त्यांचा ईनोद, त्यांच्या क्लृप्त्या, त्यांच्या समजुती, भाबडेपणा या सर्वच गोष्टी त्यांनी रामनगरीमधून खुमासदार पद्धतीने प्रेक्षकांसमोर तसेच पुस्तकरूपाने वाचकांपर्यंत पोहचविल्या. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# तुमचा फोन रेकॉर्ड तर होत नाही ना? असे ओळखा




जेव्हा आपण फोनवर कोणाशी बोलतो तेव्हा ती गोष्ट तिसर्या व्यक्तीपर्यंत पोहोचू इच्छित नाही, पण, स्मार्टफोनवर बोलत असताना कॉल रेकॉर्डिंगचा धोका असतो. समोरची व्यक्ती कॉल दरम्यान तुमचा कॉल रेकॉर्ड करत आहे की नाही हे तुम्हाला कसे कळेल ते आम्ही तुम्हाला सांगतो.

कॉल रेकॉर्डिंग सुरू आहे हे जाणून घेण्याच्या सोप्या आयडिया...

* जर तुम्हाला कॉल आला किंवा तुम्ही एखाद्याला कॉल केला आणि फोन रिसिव्ह केल्यानंतर काही सेकंदांनंतर तुम्हाला बीपचा आवाज आला, तर तुमचा कॉल रेकॉर्ड होत असण्याची शक्यता आहे. अनेक वेळा ॲप्सद्वारे रेकॉर्डिंग करताना मध्येच बीप-बीपचा आवाज येतो.

* कॉलवर बोलत असताना फोन खूप गरम होत असेल तर कदाचित तुमचा कॉल रेकॉर्ड होत असेल, तसेच तुम्ही कुणासोबत बोलत असाल आणि तुम्हाला आजुबाजुचा जास्त आवाज येत असेल तर कदाचित तुमचे बोलणे रेकॉर्ड होत आहे.

* तुम्ही तुमच्या फोनमधील डेटाचा वापरही तपासावा. कॉलिंग ॲप्समध्ये डेटाचा जास्त वापर होत असेल तर तुमचा कॉल रेकॉर्ड होण्याची शक्यता आहे. हे ॲप तुमची वैयक्तिक माहिती दुसऱ्या सर्व्हरवर सेव्ह करत असण्याची शक्यता आहे.


* कॉलिंगदरम्यान तुमच्या फोनच्या स्क्रीनवर माईकचा आयकॉन येत असेल, तर समजावे की तुमचा कॉल रेकॉर्ड होत आहे.

* अनेक फोनमध्ये रेकॉर्डिंगची सुविधा नसते, त्यामुळे जर कोणी फोन स्पीकरमध्ये ठेवून बोलत असेल, तर तो दुसऱ्या फोनवरून तुमचे बोलणे रेकॉर्ड करत असल्याची शक्यता आहे. जर कॉल जास्त वेळ स्पीकरवर असेल, तर तुमचा कॉल रेकॉर्ड होत असण्याची शक्यता आहे.

# आज जागतिक महासागर दिन

जागतिक महासागर दिन ८ जूनला साजरा केला जातो. संपूर्ण जगभरात या दिवसाला विषय महत्व आहे. संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस ८ जूनपासून अधिकृतरीत्या साजरा करण्यास सुरूवात केली. समुद्र दूषित होण्याचे प्रमाण वाढल्याने त्यासंबंधी जनजागृती करणे आवश्यक बनले आहे. या संदर्भातला प्रस्ताव १९९२ मध्येच कॅनडाने ब्राझीलमध्ये झालेल्या वसुंधरा शिकार परिषदेत मांडला. त्याला संयुक्त राष्ट्रसंघाने २००८ मध्ये मान्यता दिली. तेव्हापासून 'द ओशन प्रोजेक्ट' या अमेरिकन संस्थेच्या सहकार्याने जागतिक महासागर दिन आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा होत आहे.

जगभरातील महासागरांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस वर्षातून एकदा साजरा केला जातो. महासागर हे संरक्षिले जावेत आणि नैसर्गिकदृष्ट्या असलेले त्यांचे महत्व जपले जावे असा हा दिवस साजरा करण्याचा मुख्य हेतू आहे. प्राणवायू, वातावरणाचे नियमन, अन्नाचा पुरवठा, औषधे आणि अन्य बाबींसाठी महासागरांचे स्थान महत्वाचे आहे. या निमित्ताने व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर महासागर रक्षणाची संधी घेतली जाते. दरवर्षी एखादा ध्येय ठेऊन हा दिवस साजरा केला जातो. २०१८ मध्ये प्लास्टिकपासून महासागराचे रक्षण हे ध्येय ठेवण्यात आले होते. पृथ्वीच्या



**निमित्त**

एकूण क्षेत्रफळाच्या ७१ टक्के भूभाग हा विविध प्रकारच्या जलस्रोतांनी व्यापला आहे आणि त्यापैकी तब्बल ९७ टक्के जलसाठा हा खाड्या, समुद्र आणि महासागरांच्या रूपात आहे.

'द ओशन प्रोजेक्ट' या १९९७ साली अमेरिकेत स्थापन झालेल्या (आणि आता जागतिक झालेल्या) प्राणिसंग्रहालये, मत्स्यालये, संग्रहालये यांच्या संघटनेने 'एकच महासागर' ही संकल्पना मांडली. परंतु भौगोलिकदृष्ट्या आणि राजकीयदृाही या 'एकच महासागरा'ची पाच खंडांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे समुद्र हा खाद्य आणि विपुल प्रमाणात ऑक्सिजन पुरविणारा स्रोत, जैवविविधतेचे महाकाय भांडार, अनेकविध रत्ने, खनिजे, तेल आपल्या उदरात बाळगणारा रत्नाकर. ही सर्व वर्णने अपुरी पडतील, अशा अगणित मार्गांनी महासागर मानवासाठी व एकूणातच चराचर सृष्टीसाठी महत्त्वपूर्ण आहे.

जागतिक महासागर दिनानिमित्ताने संयुक्त राष्ट्रांचे सर्व सदस्य देश, त्यांतील सागरी परिसंस्थेशी संबंधित संस्था, अनेक स्वयंसेवी संस्था, संशोधक-अभ्यासक मिळून समुद्राविषयीचे विविध पैलू जगासमोर आणण्याचा प्रयत्न करतात. सर्वांनाच सागराबद्दल कुतूहल असते. अर्धी पृथ्वी जरी आपण तिच्या नैसर्गिक स्वरूपात राखू शकलो, तरी तब्बल दहा लाख प्रजातींना नष्ट होण्यापासून आपण वाचवू शकतो, असा शास्त्रज्ञांचा अभ्यासपूर्ण कयास आहे. सांडपाणी, औद्योगिक प्रदूषके, मुदत संपलेली वा घातक रसायने, प्लास्टिकच्या बाटल्या नि पिशव्या समुद्रात टाकल्या जातात. कचरा कोणताही असो-फेका समुद्रात! अहो केवढा मोठा आणि खोल समुद्र असतो समुद्र, एवढ्याशा कचर्याने काय होतंय? ही प्रथा जगभरातील (व्यक्तीपासून राष्ट्रांपर्यंत) बहुतेक सर्वांनीच पाळल्यामुळे आता मात्र परिस्थिती गंभीर बनली आहे. मासे मिळवण्यासाठी अधिकाधिक खोल समुद्रात जावे लागत आहे, पाण्याचा दर्जा घसरला आहे. हवामानावर परिणाम होत आहे. विशिष्ट सजीव नष्ट होऊ लागले आहेत. हे सारे थांबविणे हेच या दिनाचे खरे उद्दिष्ट आहे. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# व्यायाम करताना अशी घ्या त्वचेची काळजी...



हल्ली माणसांच्या दिसण्यावरूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व ठरवले जाते. त्यामुळे त्वचेची काळजी घेणे सर्वच वयोगटातील व्यक्तींसाठी गरजेचे आहे. जर तुम्ही जर वर्कआऊट, व्यायाम करीत असाल तर वर्कआऊटचा तुमच्या शरीर आणि मनावर सारखाच परिणाम होत असतो कारण यामुळे घामावाटे तुमच्या शरीरातील टॉक्सिन्स बाहेर टाकले जातात. तुम्ही व्यायाम करता तेव्हा तुमच्या त्वचेवर घामाचा खूप थर जमा होत असतो. या घामामुळे तुमच्या त्वचेवरील पोअर्स बंद होण्याची शक्यता असते. यासाठीच आम्ही तुमच्यासोबत अशा काही सोप्या टिप्स फॉलो करत आहोत.

वर्कआऊट करण्यापूर्वी मेकअप करू नका : वर्कआऊट करताना त्वचेचे पोअर्स मोकळे होत असतात. अशावेळी या पोअर्सच्या माध्यमातून तुमचा मेकअप त्वचेच्या खोलवर जाऊन सेट होऊ शकतो. असे झाल्यास पिंपल्स, तेलकट त्वचा अशा अनेक त्वचेच्या समस्या निर्माण होऊ शकतात. शिवाय वर्कआऊट करताना तुमच्या त्वचेला ऑक्सिजनचा पूरवठा या पोअर्सच्या माध्यमातून होत असतो, मात्र मेकअपमुळे तुमच्या त्वचेचे पोअर्स बंद राहतात आणि त्वचेला ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो.

चेहऱ्याला वारंवार स्पर्श करू नका : व्यायामादरम्यान चेहऱ्याला वारंवार स्पर्श करणे टाळावे. कारण जिम करताना प्रत्येकजण एक्सरसाइज मशीनला हात लावतो. अशा वेळी तुम्हाला इन्फेक्शनचा धोका असू शकतो. त्यामुळे व्यायामा दरम्यान चेहऱ्यावर हात ठेवू नका.

वर्कआऊटनंतर चेहरा स्वच्छ धुवा : ही एक अतिशय सोपी आणि पटकन करण्यासाठी युक्ती आहे. व्यायाम झाल्यावर लगेचच तुमचा चेहरा साध्या पाण्याने स्वच्छ धुवा ज्यामुळे तुमच्या त्वचेवरील घाम आणि त्यातून निर्माण होणारे जीवजंतू नष्ट होतील. व्यायामानंतर यासाठीच अंघोळ करणं फार गरजेचं आहे. पण तुमची जीम घरापासून फार दूर असेल तर घरी जाऊन अंघोळ करण्यापूर्वी चेहरा स्वच्छ धुण्यास विसरू नका.

# अंधारात अंत्यसंस्कार! श्रीवर्धन स्मशानभूमीतील गैरसोयींवर नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त

## पथदिवे बंद असल्याने मोबाईलच्या प्रकाशात पार पडला अंत्यविधी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

पर्यटनाच्या नकाशावर वेगाने प्रगती करणाऱ्या श्रीवर्धन शहरात एक धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. शहरातील शासकीय विश्रामगृहाजवळील स्मशानभूमीत पथदिवे बंद असल्याने एका मृत व्यक्तीचे अंत्यसंस्कार मोबाईलच्या प्रकाशात करण्याची वेळ नातेवाईकांवर आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

मृत्यू हा प्रत्येकाच्या आयुष्यातील अटळ सत्य असून, मृत व्यक्तीला शेवटचा निरोप देताना त्याचा सन्मान राखला जावा, अशी प्रत्येक कुटुंबाची अपेक्षा असते. मात्र, शुक्रवार (दि. ५ जून) रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीत



आणलेल्या मृतदेहाच्या अंतिम विधीवेळी मूलभूत प्रकाश व्यवस्थेचाच अभाव असल्याचे वास्तव समोर आले.

स्मशानभूमी परिसरातील पथदिवे बंद अवस्थेत असल्याने अंत्यसंस्कारासाठी उपस्थित असलेल्या नातेवाईकांना आणि नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. अंधारामुळे विधी पार पाडण्यात अडथळे निर्माण झाले.

परिस्थिती इतकी गंभीर होती की, उपस्थितांना मोबाईलच्या टॉर्चचा आधार घेऊन अंत्यविधी पूर्ण करावे लागले. या घटनेमुळे उपस्थितांमध्ये संताप आणि हळहळ व्यक्त करण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच काही नागरिकांनी संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, तातडीने तोडगा न निघाल्याने अंत्यसंस्कार अंधारातच पार पाडावे लागल्याचे सांगितले जाते. शहरात विविध विकासकामे, पर्यटन प्रकल्प आणि कोट्यवधी रुपयांच्या योजनांची अंमलबजावणी होत असताना स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे ही चिंतेची बाब असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

स्मशानभूमी हे केवळ अंत्यसंस्काराचे ठिकाण नसून समाजाच्या संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. अशा ठिकाणी प्रकाश, पाणी, सुरक्षितता आणि स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. या घटनेनंतर स्मशानभूमीतील सुविधांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

**काही तांत्रिक कारणांमुळे तेथील वीजपुरवठा खंडित झाला होता. दुर्दैवाने त्याच काळात अंत्यसंस्काराची वेळ आल्याने नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागला. झालेल्या प्रकाराबद्दल श्रीवर्धनचा प्रथम नागरिक म्हणून मी दिलगिरी व्यक्त करतो. भविष्यात अशी घटना घडू नये यासाठी नगरपालिका आवश्यक उपाययोजना करेल तसेच स्मशानभूमी आणि कब्रस्तानाचे सुशोभीकरण करून तेथे सौरऊर्जेवर चालणाऱ्या दिव्यांची व्यवस्था करण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल.**

**–ॲड. अतुल चौगुले,**
**नगराध्यक्ष,**
**श्रीवर्धन नगर परिषद**

# खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेची उपाययोजना

## जि.प. सभापती वैकुंठ पाटील यांचा पुढाकार

**पेण : प्रतिनिधी**

खरीप हंगाम तोंडावर असताना खतांसाठी कृषी सेवा केंद्रांवर होणारी गर्दी, उपलब्धतेबाबतची अनिश्चितता आणि कृत्रिम टंचाईच्या तक्रारी यावर रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने प्रभावी उपाय शोधला आहे जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्रांमधील खत साठ्याची माहिती आता शेतकऱ्यांना एका क्लिकवर उपलब्ध होणार असून खत वितरण व्यवस्थेत डिजिटल पारदर्शकतेचा नवा अध्याय सुरू झाला आहे रायगड जिल्हा परिषदेचे कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी यासाठी पुढाकार घेतला असून कृषी विभागाने तयार केलेल्या विशेष ब्लॉग



भारी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांची माहिती आणि त्या केंद्रांमध्ये उपलब्ध असलेल्या विविध खतांच्या साठ्याचा तपशील शेतकऱ्यांना घरबसल्या पाहता येणार आहे त्यामुळे खताच्या शोधात अनेक दुकाने फिरण्याची गरज उरणार नाही या डिजिटल प्लॅटफॉर्मवर संबंधित तालुका निवडल्यानंतर त्या परिसरातील कृषी सेवा केंद्रांची यादी आणि त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या खतसाठा पाहता येणार आहे, विशेष म्हणजे ही माहिती नियमितपणे अद्यावत केली जाणार असल्याने शेतकऱ्यांना अचूक आणि ताजी माहिती मिळणार आहे.

खरीप हंगामात युरिया, डीएपी, एनपीके यांसारख्या खतांची मागणी वाढते. तिथं हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे वेळ पैसा आणि श्रम वाचविण्यासोबतच योग्य नियोजन करून खत खरेदी करणे ही शक्य होणार आहे याशिवाय खत साठ्याची माहिती सार्वजनिक झाल्याने साठेबाजी काळाबाजार आणि कृत्रिम टंचाई निर्माण करण्याच्या प्रवृत्तींवरही नियंत्रण येण्याची अपेक्षा जिल्हापपरिषद कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी व्यक्त केली.

# भाजप शिष्टमंडळाची रोह्यातील विकास बामणे यांच्या शिवाराला भेट

**धाटाव : प्रतिनिधी**

बदलत्या काळात शेती तोट्याची नव्हे तर योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान आणि अथक परिश्रम यांच्या बळावर नफ्याची ठरू शकते, हे वाशी येथील प्रगतशील युवा शेतकरी तथा रोहा तालुका किसान युवा मोर्चाचे पदाधिकारी विकास लक्ष्मण बामणे यांनी सिद्ध करून दाखविले आहे. अवघ्या एका एकर क्षेत्रात भेंडी व दुधीचे उत्पादन घेत त्यांनी आर्थिक प्रगतीचा नवा आदर्श निर्माण केला असून त्यांच्या कार्याची चर्चा सध्या संपूर्ण तालुक्यात होत आहे.

विकास बामणे यांनी सुमारे ५० हजार रुपयांची गुंतवणूक करून एका एकरात भेंडी व दुधीची लागवड केली आहे. सध्या त्यांच्या शेतातून दररोज



जवळपास १०० किलो भेंडी तसेच २५ ते ३० किलो दुधीचे उत्पादन बाजारपेठेत दाखल होत आहे. भेंडीला प्रतिकिलो ३५ रुपये तर दुधीला २५ रुपये दर मिळत असल्याने या पिकातून त्यांना समाधानकारक उत्पन्न मिळत आहे. शेतीमध्ये हवामानातील अनिश्चितता, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारभावातील चढ–उतार यांसारख्या अनेक संकटांचा सामना करावा लागत असला तरी सकारात्मक दृष्टीकोन आणि नियोजनबद्ध शेतीच्या जोरावर यश मिळविता येते, असा विश्वास विकास बामणे यांनी व्यक्त केला. त्यांच्या शेताला भेट देऊन अनेक शेतकरी शेतीतील बारकावे जाणून घेत असून युवा वर्गालाही शेतीकडे वळण्याची प्रेरणा मिळत आहे.

विकास बामणे यांचा शेतीतील अनुभव तब्बल वीस वर्षांचा आहे. सुतारवाडी येथे पाच वर्षे तर चणेरा परिसरात जवळपास पंधरा वर्षे त्यांनी कलिंगड शेतीमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यंदा सुतारवाडी येथे घेतलेल्या कलिंगड पिकातून त्यांनी सुमारे २१ लाख रुपयांची उलाढाल केली. सात लाख रुपये खर्च करून तब्बल १४ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळवित त्यांनी शेतीतील आपले कौशल्य पुन्हा एकदा सिद्ध केले. त्यांचा कलिंगडाचा माल खेड व चिपळूण बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी जातो.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने त्यांच्या शेतीला भेट देऊन विविध पिकांची पाहणी केली. यावेळी रोहा तालुका भाजपा अध्यक्ष अमित घाग यांनी विकास बामणे यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. "आज अनेक युवक शेतीकडे पाठ फिरवत असताना विकास बामणे यांनी आधुनिक शेतीच्या माध्यमातून यशाचे नवे उदाहरण निर्माण केले आहे. कमी क्षेत्रात आणि मर्यादित खर्चात भरघोस उत्पादन घेऊन त्यांनी शेती व्यवसायालाही प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. त्यांच्या कार्यातून युवा पिढीने प्रेरणा घेण्याची गरज आहे," असे गौरवोद्गार अमित घाग यांनी काढले.

यावेळी तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, नगरसेवक रोशन चाफेकर, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, तालुका युवा मोर्चा अध्यक्ष नरेश कोकरे, महिला मोर्चा अध्यक्ष रिया कासार, सरचिटणीस सायली बामणे, धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, धर्मा कोकरे, वैभव कुलकर्णी, ज्ञानेश्वर जाधव, सुरेखा कदम, अदिती शिंदे, जयश्री भांड यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तर कष्ट, चिकाटी आणि आधुनिक शेतीची जोड दिल्यास शेती हा सर्वाधिक फायदेशीर व्यवसाय ठरू शकतो, हे विकास बामणे यांच्या यशस्वी वाटचालीतून अधोरेखित होत आहे. त्यामुळेच आज ते केवळ वाशी गावापुरते मर्यादित न राहता रोहा तालुक्यातील युवा शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून उदयास येत आहेत.

# रानवली धरणातील जलसाठा संपत आल्याने नागरिक चिंतेत

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहराला पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत असलेल्या रानवली धरणातील जलसाठा अत्यंत खालावल्याने शहरावर गंभीर पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे. उन्हाळ्याच्या अखेरीस धरण जवळपास कोरडे पडल्याचे चित्र समोर येत असून, शहरातील अनेक भागांत नागरिकांना चार दिवसाआड पाणीपुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत आहे. वाढते तापमान, घटता जलसाठा आणि अपुऱ्या नियोजनामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

शहरासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेली पाणीपुरवठा योजना सुरुवातीपासूनच विविध तांत्रिक त्रुटी आणि निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे चर्चेत राहिली आहे. गेल्या काही वर्षांत अनेक ठिकाणी पाईपलाईन फुटणे, गळती होणे आणि हजारो लिटर पाणी वाया जाण्याच्या घटना सातत्याने घडत राहिल्या. नागरिक आणि सामाजिक संघटनांनी वेळोवेळी याकडे लक्ष वेधले असतानाही संबंधित यंत्रणेकडून प्रभावी उपाययोजना करण्यात आल्या नाहीत

उन्हाळ्यापूर्वीच जलसाठ्याची पातळी कमी होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत होते. मात्र पर्यायी जलस्रोतांचा शोध, जलसंधारण उपाययोजना, गळती रोखण्यासाठी विशेष मोहीम किंवा टँकर व्यवस्थेचे आगाऊ नियोजन यांसारख्या उपायांकडे पुरेसे लक्ष देण्यात आले नाही. परिणामी आता नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.



चार दिवसाआड होणारा पाणीपुरवठा अनेक भागांत अपुरा ठरत असून, नागरिकांना पिण्याचे पाणी साठवून ठेवण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या कुटुंबांना या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे. काही भागांत नागरिकांना खासगी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली असून त्यामुळे आर्थिक भारही वाढला आहे.

नागरिकांकडून प्रशासनाने तातडीने टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, रानवली धरणातील उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करावे आणि भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी दीर्घकालीन उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली जात आहे. तसेच पाणीपुरवठा योजनेतील निकृष्ट कामे, वारंवार होणाऱ्या गळती आणि पाण्याच्या अपव्ययाबाबत सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही जोर धरत आहे.

दरम्यान, जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. रानवली धरणातील जलसाठा दिवसेंदिवस कमी होत असताना प्रशासनासमोर आता मोठे आव्हान उभे ठाकले आहे. तातडीच्या उपाययोजनांसह भविष्यातील जलनियोजनावर भर देणे गरजेचे असून, अन्यथा येत्या काळात श्रीवर्धनकरांना अधिक तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

**नगरविकास विभागाच्या निर्देशानुसार श्रीवर्धन शहरात निर्माण झालेल्या नैसर्गिक जलटंचाईच्या परिस्थितीचा गांभीर्याने आढावा घेण्यात आला आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा कोणताही त्रास होऊ नये यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात येत आहे. उपलब्ध जलसाठ्याचा सुयोग्य व काटकसरीने वापर करणे अत्यावश्यक असून नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा. पाणीपुरवठा व्यवस्थेचे नियोजन शासनाच्या नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येत आहे. या संकटकाळात प्रशासन आणि नागरिकांच्या सहकार्याने परिस्थितीवर प्रभावीपणे मात करू, असा विश्वास आहे.**

**– ॲड. अतुल चौगुले,**
**नगराध्यक्ष, श्रीवर्धन**

# कर्जत स्टेशनमधील भिसेगाव तिकीट खिडकी दोन शिफ्टमध्ये राहणार सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

भिसेगाव दिशे कडील तिकीट खिडकी आता दोन शिफ्टमध्ये आता सुरू राहणार आहे. त्यामुळे त्या भागातील कर्जतकर रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनच्या पाठपुराव्याला यश आले आहे. याकामी कमर्शियल चिफ इन्स्पेक्टर शिरीष कांबळे यांचे विशेष सहकार्य कर्जत पसेंजर असोसिएशन यांना लाभले आहे.

कर्जत रेल्वे स्थानकात असलेल्या भिसेगाव बाजूकडील तिकीट खिडकी दुपारनंतर बंद असते. मागील अनेक महिन्यांपासून कर्जत रेल्वे पॅसेंजर्स असोसिएशन कडून या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. विशेषतः सकाळ आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत प्रवाशांना लांबच लांब रांगा, वेळेचा अपव्यय आणि तिकीट मिळवण्यासाठी होणारा त्रास यामुळे ही मागणी अधिक जोर धरत होती. प्रवाशांची वाढती संख्या आणि वाढती गर्दी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने अखेर सकारात्मक निर्णय घेतला आहे.

यासाठी कमर्शियल चिफ इन्स्पेक्टर शिरीष कांबळे यांनी वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवत विशेष पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा प्रश्न मार्गी लागल्याचे सांगितले जात आहे.

या नव्या व्यवस्थेमुळे भिसेगाव परिसरातील तसेच स्थानकाच्या त्या बाजूने ये–जा करणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. विशेषतः कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी आणि नियमित प्रवाशांसाठी ही सुविधा अधिक उपयुक्त ठरणार आहे. अन्यथा भिसेगाव कडील प्रवाशांना अनेक वेळा मुख्य तिकीट खिडकीवरून तिकीट काढतांना प्रवाशांची धावपळ होत असे. त्यामुळे गाड्या निघून जात असत. या निर्णयामुळे कर्जत रेल्वे स्थानक परिसरातील प्रवाशांची गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार असून रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाचे प्रवाशांकडून स्वागत केले जात आहे.




# सावरोली गावातून दोन सख्ख्या अल्पवयीन भावंडांचे अपहरण

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील सावरोली गावातील दहा वर्ष आणि सहा वर्ष वयाच्या दोन अल्पवयीन मुलांचे अपहरण झाल्याची तक्रार मुलांच्या आईने दिली आहे.

संगीता प्रजापती वय ३३ मुळची उत्तर प्रदेश येथील राहणारी असून कामानिमित्त सावरोली गाव येथे सध्या राहत आहेत. शुक्रवारी संगीता कामावर गेली होती. संध्याकाळी सहा वाजणेच्या सुमारास घरी आली असताना मोठा मुलगा कृष्ण गोपाल आणि छोटा सुमित घरी नसल्याचे आढळून आले. संगीताने गावात सर्वत्र शोध घेतला. परंतु दोघांचा काही तपास लागला नाही. अखेरीस संगीताने खालापूर पोलीस ठाणे गाठत मुले हरवल्याची तक्रार दिली आहे.

दोन्ही मुले अल्पवयीन असून त्याच्या अज्ञान पणाचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केल्याचा गुन्हा खालापूर पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मोहन भालेराव करत आहेत.

**Shri. Chhatrapati Shivaji Vidyalay and J. A. Bhagat junior College Gavhan, Tal. Panvel, Dist. Raigad**

**Notice Inviting Tender**

Rayat Shikshan Sanstha's Shri. Chhatrapati Shivaji Vidyalay and J. A. Bhagat junior College, Gavhan, Tal. Panvel, Dist. Raigad invites tenders for Chairman Room Repair Works from reputed contractors. Sale of tenders from 08/06/2026 at 11.00 am till 12/06/2026 upto 01.00 pm at Shri. Chhatrapati Shivaji Vidyalay and J. A. Bhagat junior College, Gavhan, Tal. Panvel, Dist. Raigad. Submission of tender till 13/06/2026 upto 03.00 pm.

| Name of work | Estimated Cost | Blank Tender Cost | EMD (in form of D.D) |
|---|---|---|---|
| Chairman Room Repair Works Head | Rs. 5,32,516/- | Rs. 1000/- (non refundable) | Rs. 30,000/- |

Sd/-
Head Mistress,
Shri. Chhatrapati Shivaji Vidyalay and
J. A. Bhagat junior College Gavhan,
Tal. Panvel, Dist. Raigad

# पाच बिनविरोध, तीन जागांसाठी लढत

## नवी मुंबई पथविक्रेता समिती निवडणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका शहर पथविक्रेता समितीच्या आठ सदस्यांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. पाच जागा बिनविरोध, तर सर्वसाधारण प्रवर्गातील तीन जागांसाठी झालेल्या मतदानात ४८.६२ टक्के पथविक्रेत्यांनी हक्क बजावला. निवडून आलेल्या सर्व सदस्यांना निवडणूक निर्णय अधिकारी अजय साबळे यांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत.

महानगरपालिका शहर पथविक्रेता समितीच्या पथविक्रेता प्रवर्गातील आठ सदस्यांच्या निवडणुकीसाठी ४ जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. महिला प्रवर्गासाठी राखीव असलेल्या एका जागेसाठी चार महिला निवडणुकीच्या रिंगणात होत्या, तर सर्वसाधारण प्रवर्गासाठीच्या दोन जागांसाठी एकूण १४ उमेदवार रिंगणात होते. तत्पूर्वी अनुसूचित जाती, इतर मागास प्रवर्ग, अल्पसंख्याक आणि विकलांग या प्रवर्गातील जागांसाठी केवळ एकच अर्ज वैध ठरल्याने त्या–त्या प्रवर्गाचे सदस्य बिनविरोध निवडून आले. अनुसूचित जमाती प्रवर्गात एकही अर्ज प्राप्त झाला नसल्याने सदरची जागा रिक्त राहिली आहे.

तीन जागांसाठी नवी मुंबई शहरात विभागनिहाय एकूण नऊ मतदान केंद्रांवर ४ जून रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान झाले. एकूण ७००९ बायोमॅट्रिक सर्वेक्षण झालेल्या नोंदीत मतदारांपैकी ३४०८ पथविक्रेत्यांनी मतदान केले. मतदानाची टक्केवारी ४८.६२ इतकी आहे. मतदान संपल्यानंतर त्याच दिवशी नवी मुंबई महानगरपालिकेच्या बेलापूर येथील मुख्यालयात सायंकाळी ८ ते रात्री १२ या वेळेत मतमोजणी पार पडली. सर्व निवडून आलेल्या उमेदवारांना शहर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक निर्णय अधिकारी अजय साबळे यांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

**घोषित निकालानुसार प्रवर्गनिहाय निकाल :**

* अनुसूचित जाती महिला : ज्योती दीपक पोटे – बिनविरोध
* अनुसूचित जमाती सर्वसाधारण : निरंक/रिक्त
* इतर मागास प्रवर्ग महिला : धनश्री दीपक पाटील – बिनविरोध

**अल्पसंख्याक सर्वसाधारण**

* सय्यद मस्तान फकिरा – बिनविरोध
* विकलांग/दिव्यांग सर्वसाधारण : कृष्णा पांडुरंग खरात – बिनविरोध
* सर्वसाधारण महिला राखीव : रेखा अनिल चिकणे – १२१ मतांनी विजयी
* सर्वसाधारण : अनिल गेणू चिकणे – २५७ मतांनी विजयी
* सर्वसाधारण : श्रीकांत भगवान भोईर – १८१ मतांनी विजयी.

# तापमान वाढल्याने नद्या आटल्या

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**



गेल्या काही महिन्यांपासून वाढलेल्या तापमानामुळे पनवेल तालुक्यातील नद्या, विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडल्या असून नागरिकांना पाणीटंचाईची झळ बसत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आदिवासी बांधवांना भटकंती करावी लागत असून अनेकांना टँकरचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. पनवेल तालुक्यात तापमान वाढल्याने पाणीपातळी झपाट्याने घटू लागली आहे.

२०२५मध्ये जवळपास सहा महिने पाऊस झाला. नोव्हेंबर महिन्यापर्यंत पाऊस असल्याने नदीपात्रांमध्ये अधिक काळ पाणी साचून राहील असा अंदाज वर्तवण्यात आला होता तसेच थंडीचे वातावरणदेखील चांगले असल्याने नद्यांमधील पाणीसाठा टिकून होता, मात्र मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून तालुक्यात तापमान वाढण्यास सुरुवात झाली आणि नद्यांच्या पाणीपातळीत कमालीची घट झाली. त्याची झळ नागरिकांना बसत आहे. सध्या जून महिना उजाडला असून पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे नद्यांमधील पाणी मोठ्या प्रमाणात आटले आहे. बहुतांश ठिकाणी नदीचे पात्र कोरडे झाले आहे. नदीच्या पाणीपातळीवर अनेक गावांतील विहिरींची पातळी अवलंबून असते.

आदिवासी भागातील विहिरींचे पाणीदेखील आता आटले आहे. पनवेल तालुक्याची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, मात्र त्यांना पाणीपुरवठा करणारी साधने कमी पडत आहेत. काही ठिकाणी खोदण्यात येणाऱ्या बोअरवेललाही पाणी लागत नाही. तालुक्यातील अनेक विहिरी, बोअरवेल आणि नद्यासुद्धा आता कोरड्या पडल्या आहेत.

## निवडक

### कळंबोलीत जुगार अड्ड्यावर छापा




**नवीन पनवेल :** कळंबोली येथे मॅकडोनाल्डच्या पाठीमागे मोकळ्या जागेत सार्वजनिक ठिकाणी 'अंदर बाहेर' पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या पाच जणांवर गुन्हे शाखा कक्ष ३ने छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत २७ हजार ६०० रुपये जप्त करण्यात आले. गुन्हे शाखा कक्ष ३ला कळंबोली मॅकडोनाल्डच्या पाठीमागील बाजूस मोकळ्या जागेत सार्वजनिक ठिकाणी अंदर बाहेर हा पत्त्यांचा जुगाराचा खेळ खेळत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी रियाज सनसुर खान, हकीम अमीर मंडळ, गोविंदा सुखदेव गोरे, अनवर अकबर शेख, धर्मापद टेंभे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्याकडून २७ हजार ६०० रुपये जप्त करण्यात आले आहेत.

### दुकानाचे शटर तोडून भांडी लंपास

**नवीन पनवेल :** तळोजा फेस वन येथील दुकानाचे शटरचे लॉक तोडून तीन अनोळखी महिलांनी ३१ हजार ८०० रुपये किमतीची भांडी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गौरव पवार हे पिसार्वे, तळोजा येथे राहत असून त्यांच्या स्काय लाईन सफायर सोसायटी, तळोजा फेस वन येथे दुकान आहे. तीन अनोळखी महिलांनी दुकानाचे शटरचे लॉक तोडून आत प्रवेश केला.त्यांनी दुकानातील ३१ हजार ८०० रुपयांची भांडी चोरून नेली. याप्रकरणी ५ जून रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सोशल वेल्फेअर क्लबवर छापा

**नवीन पनवेल :** पनवेल शहरातील जनता मित्र मंडळ सोशल वेल्फेअर क्लबमध्ये बेकायदेशीररित्या तीन पत्ती जुगार खेळण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्याप्रकरणी पोलिसांनी छापा टाकून आठ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, या कारवाईत पाच हजार ३०० रुपये जप्त करण्यात आले. जनता मित्र मंडळ सोशल वेल्फेअर क्लबमध्ये तीन पत्ती जुगार खेळला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. या वेळी सुनील खंडेराव देशमुख, शरद विश्राम कळंबकर, शैलेश दिनेश पांडे, राहुलकुमार दिनेश शहा, शामसुंदर सियाराम सिंग, किराणा रुद्राप्पा चौधरी, जितू कुमार आणि भोजूबाब संजन यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### खारघरमध्ये हिट ॲण्ड रन

**पनवेल :** पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव अज्ञात वाहनाने खारघर येथे रस्त्याने जाणाऱ्या महिलेला धडक दिल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालकाने वाहनासह पलायन केले असून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मुंबई–पुणे महामार्गावर खारघर येथे ही घटना घडली. ही धडक इतकी भीषण होती की महिलेच्या डोक्याला आणि डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली. अतिरक्तस्त्राव आणि गंभीर जखमांमुळे तिचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि पाहणी करून फरारी वाहनचालकाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मृत महिलेची अद्याप ओळख पटलेली नसल्याने तिची ओळख पटवण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत.

# कळंबोलीत व्हॉट्सॲपवरून ३८ लाखांना घातला गंडा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

व्हॉट्सॲपवर कंपनी मालकाचे नाव आणि लोगो वापरून बनावट प्रोफाइल तयार करत एका व्यक्तीला ३८ लाख ३० हजार रुपये बँकेत पाठवण्यास भाग पाडून फसवणूक केल्याचा प्रकार कळंबोलीत उघडकीस आला आहे. पोलिसांनी अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

हितेश दहिवलीकर हे नेरळ, कर्जत येथे राहतात. त्यांच्या मोबाइलमध्ये ताराचंद इंडस्ट्रीचे मालक हिमांशू अगरवाल यांचा मोबाइल क्रमांक सेव आहे. त्यांच्या व्हॉट्सॲपला ताराचंद कंपनीचा लोगोदेखील आहे. तोच लोगो वापरून अनोळखी व्यक्तीने हितेश दहिवलीकर यांच्या मोबाइलमध्ये हिमांशू सर याच्या नावाने दुसरा मोबाइल क्रमांक सेव्ह केला होता. ती व्यक्ती हिमांशू अग्रवाल हेच मेसेज करीत असल्याचे भासवले. फिर्यादीचा विश्वास संपादन करून ३८ लाख ३० हजार रुपये बँकेत पाठवण्यास सांगितले होते.

# धोकादायक झाड अग्निशमन दलाने केले सुस्थितीत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर २ येथील आदर्श सोसायटीमधील विशालकाय झाडाची मोठी फांदी रविवारी (दि. ७) सकाळी तुटून अर्धवट लटकत होती. मुख्य रस्त्यालगत आणि वर्दळीच्या ठिकाणी असलेले हे झाड वेळीच हटवले नसते तर मोठा अपघात घडला असता, मात्र अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे संभाव्य धोका टळला आहे.



नेरूळ सेक्टर २ येथे मुख्य रस्त्यालगत असणाऱ्या आदर्श सोसायटीमधील एका विशालकाय झाडाची मोठी फांदी आणि झाडाचा काही भाग रविवारी सकाळी तुटून अर्धवट पडला होता. सदर ठिकाणचा रस्ता वर्दळीचा असून धोकादायक स्थितीतील झाड अग्निशमन दलाने वेळीच सुस्थितीत केले नसते तर मोठा अपघात झाला असता. सोसायटी अध्यक्ष निवृत्ती कापडणे, सचिव राजे पुजारी व सोसायटी सदस्यांनी सदर गंभीर घटना इंटक नवी मुंबई अध्यक्ष आणि शिवसेना शिंदे गटाचे रवींद्र सावंत यांना तत्काळ फोन करून सांगितली.

सावंत यांनी काही क्षणात महापालिकेच्या विभाग अधिकारी व अग्निशमन केंद्र यांना फोन करून तत्काळ मदत करण्याची विनंती केली. त्यानंतर काही मिनिटांत अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी पोहचून जलदगतीने तुटलेल्या अवस्थेत पडलेल्या फांद्या कटरने कापून बाजूला केल्या. त्यानंतर उद्यान विभागाच्या गाडीने सर्व फांद्या इच्छितस्थळी पोहचवल्याने अनर्थ टळला आहे.

# वैश्य वाणी महिला मंडळाचा अधिकमास सोहळा : १७० महिलांचा सहभाग

**नवीन पनवेल : रमप्रहर वृत्त**



अधिक मासाच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधून पनवेल तालुका वैश्य वाणी समाज महिला मंडळाने आयोजित केलेला भव्य कार्यक्रम मिरची गल्लीतील वैश्य समाज हॉलमध्ये नुकताच मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. पारंपरिक विधी, मान्यवरांची उपस्थिती आणि महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला. पनवेल तालुका वैश्य वाणी समाज महिला मंडळ यांनी आयोजित केलेला अधिक मास कार्यक्रम वैश्य समाज हॉल, मिरची गल्ली, पनवेल येथे साजरा केला.

या कार्यक्रमाचे संपूर्ण श्रेय वैश्य समाज महिला मंडळ ज्येष्ठ कमिटी, रेखा जगे, भारती आंग्रे, माधुरी वाणी, रतिका जगे, रंजना तांबोळी, शुभदा मनोरे, ज्योत्स्ना मनोरे, वैशाली सोनटक्के, पुष्पा आंग्रे यांना जाते. तसेच वैश्य समाज महिला अध्यक्षा पूजा साखरे व सर्व कमिटी यांचेही या कार्यक्रमात मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रसिका महाजन यांनी केले. या कार्यक्रमास अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. वैश्य समाज रायगड जिल्हा महिला अध्यक्षा शामल आंग्रे, पनवेल वैश्य समाज अध्यक्ष सुनील शेटे, वैश्य समाज वधू–वर मंडळाचे अध्यक्ष प्रदीप दलाल, प्रवीण जगे, वैश्य समाज शिक्षण कमिटी अध्यक्ष प्रगती दलाल, वैश्य समाज गणपती समिती अध्यक्ष सर्वेश दलाल तसेच वैश्य समाज महिला मंडळाच्या सर्व आजी–माजी अध्यक्ष व उपाध्यक्ष उपस्थित होत्या.

कार्यक्रमासाठी वैश्य वाणी बांधव तसेच १६० ते १७० महिला हजर होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेकांनी हातभार लावला. राजू पाठारे यांनी स्टेजवरील डेकोरेशन, माईक, स्पीकर या सर्वांची व्यवस्था विनामूल्य केली. वैभवी गुजरे यांनीही मोलाचे सहकार्य केले. वैश्य समाज महिला मंडळाने या सर्वांचे आभार मानले. तसेच ममता महेंद्र फक्के, अश्विनी अशोक जगे, अध्यक्ष सुनील शेटे, प्रगती प्रदीप दलाल यांनी देणगी स्वरूपात मदत केली. कार्यक्रम अतिशय उत्कृष्ट पद्धतीने, ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाने आणि कार्यकारिणीच्या मदतीने पार पडला.

# पर्यावरणदिनी डोलाया किनारा स्वच्छ

**नवी मुंबई : बातमीदार**



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका व ॲडशिव टेक्नॉलॉजीज इंडिया प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने पाम बीच मार्गानजीक डोलाया सागरी किनाऱ्यावर सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ११० गोणी प्लास्टिक आणि अन्य कचरा संकलित करण्यात आला. जागतिक पर्यावरण दिनाची मध्यवर्ती संकल्पना 'हवामानासाठी आत्ताच कृती' जाहीर करण्यात आली आहे.

या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेने विविध उपक्रम राबविले असून यामध्ये मोठ्या प्रमाणात लोकसहभागावर भर दिला जात आहे. याचाच एक भाग म्हणून नवी मुंबई महानगरपालिका आणि ॲडशिव टेक्नॉलॉजीज इंडिया प्रा. लि. यांच्या सहयोगाने पाम बीच मार्गानजीक समुद्रेश्वर मंदिराच्या बाजूच्या डोलाया सागरी किनाऱ्याजवळील पाणथळ जागेत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत महापौर सुजाता पाटील यांनी सहभागी होत सागरी किनाऱ्याच्या सखोल स्वच्छतेत प्रत्यक्ष योगदान दिले आहे. दरम्यान, या मोहिमेत महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि स्वच्छताकर्मींप्रमाणेच हेंकेल कंपनीचे प्रतिनिधी, इन्व्हायरमेंट लाईफ फाऊंडेशनचे स्वयंसेवक, नेक्सस मॉलचे कर्मचारी अत्यंत उत्साहाने मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शिरवणेत जागतिक पर्यावरण दिन उत्साहात

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते वृक्षारोपण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पक्ष नवी मुंबईतर्फे शिरवणे विद्यालय व ज्युनियर कॉलेज येथे वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'एक पेड माँ के नाम' या संकल्पनेतून विद्यार्थ्यांसह झाडे लावण्यात आली. दिवसभरात सात हजार झाडे लावण्याचा संकल्प भाजपने केला. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पक्ष, नवी मुंबईतर्फे नवी मुंबई परिसरात विविध ठिकाणी वृक्ष लागवड करण्यात आली.

भाजप जिल्हाध्यक्ष राजेश पाटील यांच्या माध्यमातून शिरवणे विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज येथे आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेप्रमाणे आपल्याला हरित महाराष्ट्र आणि हरित नवी मुंबई करायची आहे. आज दिवसभरात सात हजार झाडे लावण्याचे काम आम्ही करणार आहोत आणि नुसती झाडे लावणार नाही तर ती जगवणारही आहोत. राजेश पाटील यांच्या माध्यमातून निसर्ग जपण्याचे काम केले आहे ते पुढे सुरू ठेवणार आहोत.

# पर्यावरण दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात २००० बीजमोदकांची रांगोळी

**नवी मुंबई : बातमीदार**




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबई महापालिका मुख्यालयाच्या तळमजल्यावरील पॅसेजमध्ये २००० बीजमोदकांचा वापर करून 'झाडे लावा झाडे जगवा', 'बचत पाण्याची गरज काळाची' असा संदेश देणारी लक्षवेधी रांगोळी साकारण्यात आली. आयुक्त कैलास शिंदे यांनी या पर्यावरणशील संकल्पनेचे कौतुक केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लोकसहभागातून विविध उपक्रम राबविण्याप्रमाणेच नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाच्या तळमजल्यावरील पॅसेजमध्ये 'झाडे लावा झाडे जगवा', 'बचत पाण्याची गरज काळाची' असा संदेश प्रसारित करणारी लक्षवेधी रांगोळी काढण्यात आली होती.

रांगोळीचे वैशिष्ट्य म्हणजे विविध रंगाप्रमाणेच २००० बीजमोदकांचा उपयोग करण्यात आला. विविध देशी वृक्षांची बीजे पातळ कपड्यात गुंडाळून त्यावर मातीचा थर देऊन मोदकाच्या आकाराचे बीजमोदक तयार करण्याची अभिनव संकल्पना प्रभात ट्रस्ट सेवाभावी संस्था राबवत आहे. हे बीजमोदक मोकळ्या जागी टाकल्यास त्यातून नैसर्गिकरित्या वृक्षारोपण करण्याचा हा अभिनव उपक्रम आहे.

# पाण्याच्या गुणवत्तेसाठी महापौरांचा दौरा; नमुन्याची केली तपासणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



घणसोली, ऐरोली व दिघा विभागातील एमआयडीसीच्या पाण्याच्या गुणवत्तेची पाहणी करण्यासाठी नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी रविवारी (दि. ७) विविध भागांना भेट दिली. तीन दिवसांच्या शटडाऊननंतर पूर्ववत पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर गढूळ पाण्याच्या तक्रारी कमी झाल्या असून पूर्ववत पाणीपुरवठा होत असल्याचे अभिप्राय लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून प्राप्त होत आहेत, अशी माहिती देत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी घणसोली व ऐरोलीच्या काही भागात आणि दिघा विभागात एमआयडीसीचे पाणी येत असल्याने याही पाण्याची गुणवत्ता जाणून घेण्यासाठी पाहणी करीत असल्याचे सांगितले.

मोरबेपासून नवी मुंबईतील मुख्य जलवाहिनीपर्यंत पाणी नमुन्यांच्या चाचणीची प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन महापौर व उपमहापौर तेथील स्थानिक नगरसेवकांसह पाहणी करीत असून रविवारी त्यांनी ऐरोलीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला भेट देत घणसोली, ऐरोली व दिघा विभागातील नगरसेवक व नागरिकांशी संवाद साधत जलस्थितीची तपासणी केली व घराघरांतून संकलित केलेल्या तसेच लोकप्रतिनिधी व नागरिकांनी आणलेल्या पाणी नमुन्यांची समक्ष चाचणी केली. यावेळी एफ प्रभाग समिती अध्यक्ष ललिता मढवी, नगरसेवक मनोज हळदणकर, शिवाजी खोपडे, अंजना म्हात्रे, रेश्मा मढवी, श्रेया जिरगे, गौरी आंग्रे, चांदनी चौगुले, ॲड. अपर्णा गवते, बंडू केणी तसेच अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता शंकर जाधव व संतोष उनवणे व इतर अधिकारी उपस्थित होते.

# पाली शहरात अवजड वाहन वाहतुकीस सकाळी ७ ते रात्री ८ वाजेपर्यंत बंदी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली नगरपंचायतीने केलेल्या ठरावानुसार आणि नागरिकांच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हाधिकारी किशन ना. जावळे यांनी पाली शहरातील मार्गांवर सकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत सर्व प्रकारच्या अवजड वाहन वाहतुकीस बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत.

पाली हे अष्टविनायकातील श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिराचे तीर्थक्षेत्र असून दररोज हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. अरुंद रस्त्यांवरून अवजड वाहतूक सुरू असल्याने वाहतूक कोंडी, ध्वनी व वायू प्रदूषण, अपघाताचा धोका तसेच सार्वजनिक आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर पाली नगरपंचायतीने सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक १९७ दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मंजूर करून अवजड वाहतुकीवर बंदीची मागणी केली होती.



नगरपंचायतीच्या या ठरावाला प्रतिसाद देत जिल्हाधिकाऱ्यांनी अधिसूचना काढली असून दुध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी यांसारख्या जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना मात्र या बंदीपासून सूट देण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, स्थानिक नागरिक, भाविक, शाळकरी विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि पर्यटक यांच्या सुरक्षिततेसाठी ही बंदी आवश्यक आहे.

या निर्णयाचे संपूर्ण श्रेय पाली नगरपंचायतीचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांना जाते. त्यांच्या ठरावानुसार आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच जिल्हाधिकाऱ्यांनी हा महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

> **जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने संबंधित खात्यांनी तातडीने दखल घेऊन आदेशाची अमलबजावणी लवकरात लवकर व्हावी. पाली नगरपंचायतीने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी घेतलेला ठराव आता प्रत्यक्षात उतरला असून, हा निर्णय पालीकरांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**
>
> **–पराग मेहता,**
> **नगराध्यक्ष, पाली नगरपंचायत**

## सुडकोली बस स्टॉपवर दाम्पत्याला मारहाण

### एकाविरुद्ध गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीतील मौजे सुडकोली येथे जुन्या जागेच्या कुंपणाच्या वादातून एका व्यक्तीस तसेच त्याच्या पत्नीला बांबूच्या दांडक्याने मारहाण केल्याची घटना ६ जून रोजी दुपारी सुमारे १.४५ वाजता घडली.




पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी हे सुडकोली बस स्टॉप येथे एस.टी. बसची प्रतीक्षा करत बसले असताना त्यांच्या शेजारी राहणारा आरोपी तेथे आला. मागील जागेच्या कुंपणाच्या वादाचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादी यांच्या पाठीमागून येत हातातील बांबूच्या दांडक्याने त्यांच्या पाठीवर व डाव्या हातावर वार केले.

मारहाणीदरम्यान फिर्यादी स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न करत असताना दांडक्याचा फटका त्यांच्या डाव्या हाताच्या अंगठ्यालगतच्या बोटावर बसून दुखापत झाली. तसेच पाठीवर आणि डाव्या डोळ्याजवळही मार लागल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

यावेळी फिर्यादी यांना वाचविण्यासाठी त्यांच्या पत्नीने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने तिलाही कंबरेवर व उजव्या पायाच्या पोटरीवर बांबूच्या दांडक्याने मारहाण केली. यानंतर आरोपीने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीने म्हटले आहे.

या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस हवालदार ठाकूर करीत आहेत.

# कर्जतमध्ये धनगर समाजाला हक्काचे सभागृह देणार –सुधाकर घारे

**खालापूर : प्रतिनिधी**

कर्जत मध्ये धनगर समाजाला हक्काचे सभागृह उपलब्ध करून देणार अशी आश्वासन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी धनगर समाजाला दिले आहे ते आयोजित राजामाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती उत्सव सोहळ्यात कर्जतमध्ये बोलत होते

क्षत्रिय धनगर समाज कर्जत तालुका यांच्या वतीने राजामाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती साजरी कर्जत मध्ये मोठ्या उत्साहात काल साजरी करण्यात आली,यावेळी कर्जत शहरातून हजारो समाज बांधवांच्या उपस्थितीत ढोल ताशांच्या गजरात अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून भव्य रॅली काढण्यात आली ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकापासून बाजारपेठेतून कपालेश्वर मंदिर मार्गे डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारका पर्यंत काढण्यात आली,

तर यावेळी धनगर समाजात उल्लेखनीय कार्य केलेल्या माजी सरपंच बबन खरात यांचा विशेष सत्कार जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते देऊन सन्मानीत करण्यात आले,तर यावेळी आयपीएस अधिकारी प्रवीण कोळपे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे रायगड सुधाकर घारे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उत्सव सोहळा पार पडला,

या जयंती सोहळ्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, आयपीएस अधिकारी प्रवीण कोळपे, नेव्ही अधिकारी मंथन नरुटे, कर्जतच्या नगराध्यक्षा पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, पाटील, माथेरानच्या नगरसेविका, लता ढेबे, अनुसया ढेबे, श्रीसंत बाळू मामा देवस्थानचे ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी सरपंच बबन खरात, माथाडी कामगार अध्यक्ष क्षत्रिय धनगर समाज कर्जत तालुका अध्यक्ष, शिवाजी दातीर, युवा नेते अक्षय चोपडे,, यशवंत संघर्ष सेना संस्थापक अध्यक्ष विष्णू बोराडे, हर हर चांगभले धनगर समाज संस्थेचे कार्याध्यक्ष अँड संतोष आखाडे,खजिनदार, रामदास कोकरे, मुंबई पोलीस, सचिन पारखे, नाचण सर, धाऊ खरात सर सचिन पारखे, बाबू गोरे, बाबू कोकरे, जनार्धन आखाडे, गोविंद गोरे, सुनील गोरे,रामचंद्र पुकळे, आनंदराव कचरे, माजी नगरसेविका सुनीता आखाडे,माथेरान शहराध्यक्ष राकेश कोकळे, स्वप्नाली रुपनर, शिवाजी रुपनर भीमराव ओलेकर, श्रीकांत गावडे, धनाजी बंडगर, संतोष कोळेकर, सचिन बंडगर,विठ्ठल पाटील, बिरूदेव शेजाळ अनिल शेंबडे, महादेव कोळेकर, धुळा मासाळ, दीपक जडगे, सुनील कारंडे, शरद कोळेकर, जयकुमार शेंडगे, संतोष बंडगर, अजित पुकळे, बाळू कारंडे,ठकूराम झोरे, संतोष कोकरे, अशोक शेडगे, अंकुश शेडगे, आदिसह असंख्य समाज बांधवासाह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# रोह्यातील शेतकऱ्याने साकारली क्रिकेट स्टेडियमची प्रतिकृती

**रोहा : प्रतिनिधी**

क्रिकेट खेळा हा देशात सर्वांचा आवडता खेळ आहे. क्रिकेटच्या स्पर्धा उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात होत असतात. पावसाळ्यात पावसामुळे या स्पर्धा होत नाहीत. ही स्पर्धा पावसाळ्यात व्हावी यासाठी रोहा तालुक्यातील प्रयोगशील शेतकरी म्हणून ओळख असलेल्या व क्रिकेट हौशी असलेल्या शाहीर अनंत मगर यांनी आपल्या घरी इंडोअर स्टेडियमची प्रतिकृती तयार केली आहे. या प्रतिकृतीची तालुक्यातील क्रिकेट प्रेमी, खेळाडू, राजकीय नेते व हौशी क्रीडापटू भेट देत पाहणी करून शाहीर अनंत मगर यांचे कौतुक करीत आहेत.

रोहा तालुक्यात शेतीमध्ये अनेक प्रयोग सातत्याने अनंत मगर यांनी केले आहे.संपूर्ण देशात व देशाबाहेर त्यांनी उत्पादित केलेले कलिंगड निर्यात होत असतात. शेतीमध्ये राबत असताना आपला छंद ही त्यांनी सातत्याने जोपासला आहे. शाहीर म्हणून सुद्धा ते रायगड जिल्ह्यात सह कोकणात प्रसिद्ध आहेत. त्यांना क्रिकेटची मोठी आवड आहे. देशात मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व स्थानिक क्रिकेटच्या स्पर्धा होत असतात. पावसाळ्यात मात्र या स्पर्धा पावसामुळे होत नाहीत. या स्पर्धा पावसाळ्यात व्हाव्या यासाठी या शेतकऱ्याने इंडोअर स्टेडियमची प्रतिकृती आपल्या घरी तयार केली आहे. पुढे जाऊन या प्रतिकृतीचे मोठ्या स्टेडियम मध्ये रूपांतर होऊ शकतो असा त्यांचा मानस आहे. या प्रतिकृतीची पाहणी रोहा पंचायत समिती सदस्य सुरेश मगर यांनी केले आहे.



शाहीर अनंत मगर यांनी संपूर्ण इंडोअर स्टेडियमची प्रतिकृती एचडीपी पाईपचा वापर करून तयार केला आहे. जवळजवळ एक महिन्याचे वर ही प्रतिकृती तयार करण्यासाठी त्यांना वेळ लागला असून त्यासाठी त्यांना एक लाख रुपये खर्च आला आहे. या प्रतिकृतीची उंची ७१ इंच व लांबी १४२ इंच आहे. प्रत्यक्षात या प्रतिकृतीचा मैदानात रूपांतर करायचं झाल्यास किमान पाच एकर जागा मैदानासाठी लागणार आहे.

हे मैदान १४२ मीटर रुंद व ७१ मीटर उंच तयार होऊ शकतो असे अनंत मगर यांनी सांगितले.या प्रतिकृतीची प्रत्यक्षात मैदानात रूपांतर करण्यासाठी प्रतिकृती म्हणून तज्ञ माणसाला दाखवण्याचा त्यांचा मानस आहे.

## अलिबागमधील नागाव बीच पर्यटकांना करतोय आकर्षित

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव बीच सध्या पर्यटकांसाठी हॉट डेस्टिनेशन बनला आहे. मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाणे येथून वीकेंडला येणाऱ्या पर्यटकांची येथे मोठी गर्दी दिसून येत आहे. अलिबाग शहरापासून अवघ्या ८ किमी अंतरावर असलेल्या नागाव बीचचे नावच आता पर्यटकांच्या पसंतीत आहे.नागाव बीचची खासियत नारळीच्या बागा : नागाव बीचच्या पाठीमागे दूरवर पसरलेल्या नारळीच्या बागा हे इथलं मुख्य आकर्षण आहे. "कोकणचा काश्मीर" अशी याची ओळख झाली आहे.

अलिबागच्या इतर बीचच्या तुलनेत नागाव बीचवर स्वच्छता जास्त आहे. सकाळी लवकर फिरायला येणाऱ्या पर्यटकांना शांतता मिळते.वॉटर स्पोर्ट्सचा थरार : पॅरासेलिंग, जेट स्की, स्पीड बोट, बनाना राईड, ॲटव्ही राईड यासारखे वॉटर स्पोर्ट्स तरुणाईला भुरळ घालत आहेत. सूर्यास्त आणि फोटोग्राफी : संध्याकाळी नारळीच्या बागा आणि समुद्राचा संगम पाहणं म्हणजे पर्वणीच. इंस्टा-फ्रेंडली स्पॉट म्हणूनही नागाव फेमस झालंय. मुंबई, ठाणे, पुणे आदी



शहरातून आलेल्या पर्यटकांची मागणी मोठी आहे. वीकेंडला नागावकडे जाणाऱ्या रस्त्यावर गाड्यांच्या रांगा लागतात. स्थानिक हॉटेल, रिसॉर्ट, होमस्टे १००% बुक होतात.

नागाव बीचमुळे स्थानिक कोळी बांधव, शेतकरी आणि तरुणांना रोजगार मिळाला आहे. बीचवर नारळपाणी, भुट्टा, मच्छी फ्राय, सोलकढीचे स्टॉल लागले आहेत. वॉटर स्पोर्ट्सचे व्यवसायही वाढले आहेत.ग्रामस्थांच्या मते, पावसाळयापूर्वी एप्रिल-मे महिन्यात नागाव बीचवर सर्वाधिक गर्दी असते. पावसाळा सुरू झाला की समुद्र खवळतो, त्यामुळे पर्यटकांची संख्या कमी होते."स्वच्छता राखा, बीचचा आनंद घ्या"

स्थानिक ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणाले, "नागाव बीचची प्रसिद्धी वाढली आहे हे चांगलं आहे. पण पर्यटकांनी प्लास्टिक, कचरा बीचवर टाकू नये.

# पर्यावरण दिनानिमित्त ट्रान्सवर्ड कंपनीतर्फे वृक्षारोपण करून संवर्धनाचा संकल्प

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव एमआयडीसीतील अनेक कंपन्यांनी शुक्रवारी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. त्यात प्रगती व पडत्या काळातही कामगारांच्या हितासाठी कायम अग्रेसर असलेल्या, कामगारांचा मालकाप्रती आदरभाव असलेल्या ट्रान्सवर्ड फर्टीकेम कंपनीचे अधिकारी, कर्मचारी मुख्यतः कामगारांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण व वृक्ष संवर्धनाचा दृढ संकल्प केला आहे.

पर्यावरण संरक्षण आणि शास्वत विकासाबाबत जनजागृती करण्यासाठी वृक्षारोपण उपक्रमाचे ट्रान्सवर्डने आयोजन केले होते. यावेळी कंपनीचे अधिकारी, कर्मचारी कामगार यांनी पारंपारिक महाराष्ट्रीयन फेटा परिधान करून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती... हा अनमोल संदेश दिला.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजात पोहचविणे, निसर्ग संरक्षणाचे महत्त्व अधोरेखीत करणे हाच उद्देश यामागे होता. उपस्थितांनी केवळ वृक्षारोपणच



नव्हे तर लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प यावेळी केला, अशी माहिती ट्रान्सवर्ड फर्टीकेमचे संचालक अरुण वाळुंज यांनी दिली. दरम्यान, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ट्रान्सवर्ड कंपनीची पर्यावरण बांधिलकीच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले तर पर्यावरण संवर्धनासाठी आम्ही सर्व एक आहोत असा संदेश सर्व कंपन्या, संस्थांसाठी आदर्शवत ठरला आहे.

धाटाव एमआयडीसीतील ट्रान्सवर्ड फर्टीकेम कंपनीने शुक्रवारी जागतिक पर्यावरण दिन लोकोत्सव म्हणून साजरा केला. ठिकठिकाणी वृक्षारोपण करून संवर्धनाचा संकल्प केला. यावेळी निसर्गाचे रक्षण आणि पर्यावरणचे जतन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. त्या जबाबदारीची आम्ही जाणीव ठेवून वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन केले असे मार्गदर्शन संचालक अरुण वाळुंज यांनी उपस्थितांना केले. त्यासोबत नैसर्गिक साधन संपत्तीचा जबाबदारीने वापर, जल संवर्धन तसेच प्लास्टिकचा कमी वापर करणे यासारख्या पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजनांवर वाळुंज यांनी प्रकाश टाकला. कंपनीचे अधिकारी, कर्मचारी यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमास एमपीसीबीचे अधिकारी डॉ गजानन खडकीकर, राजेश औटी,ऋतुजा भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. संचालक अरुण वाळुंज, भारतीय कामगार सेनेचे पदाधिकारी, सदस्य कंपनीचे अधिकारी, कर्मचारी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घेत पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकासात योगदान देण्याची प्रतिज्ञा केली. त्यातून ट्रान्सवर्ड कंपनीची पर्यावरण संवर्धनाप्रती बांधिलकी अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



मुरुड : तापमानात वाढ झाली असून उकाड्यापासून बचावासाठी मुक्या प्राण्यांनीही आपला मोर्चा समुद्राकडे वळवला. (छाया : सुधीर नाझरे)

# हिंदू बांधवांनी आपल्या संस्कृतीचे जतन करावे –धनंजय गद्रे

**खोपोली : प्रतिनिधी**

हिंदू बांधवांनी हिंदू संस्कृतीचे जतन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन विशेष मार्गदर्शक ज्येष्ठ कीर्तनकार धनंजय गद्रे यांनी खोपोली येथे आयोजित हिंदू संमेलन या कार्यक्रमात च्या व्यक्त केली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने श्रीराम मंगल कार्यालय हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रमुख वक्ते म्हणून गद्रे बोलत होते, यावेळी व्यासपीठावर स्व संघाचे कोकण प्रांत सहसेवा प्रमुख शिरीषजी देशमुख, उपस्थित होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोरवाल होते, प्रारंभी राष्ट्रीय सेविका समितीच्या माधवी कुवळेकर, यांनी गीत सादर केले



प्रमुख वक्ते धनंजय गद्रे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळा निमित्त इतिहासकालीन प्रसंगाचे आपल्या भाषणात जिवंत प्रसंग उभे केले. त्यांनी आजच्या युगात हिंदू संस्कृती अव्वल दर्जाची असल्याचे सांगितले.

आपल्या भाषणात शिरीष देशमुख यांनी रा स्व व संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त देशभर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे त्याचाच हा भाग असल्याचे सांगितले. संघ हा समाजात एकरूप झाला आहे, विविध सामाजिक उपक्रमातून विविध प्रकल्प राबविले जात आहेत, असेही ते म्हणाले.

# भारताची कसोटीवर मजबूत पकड

## अफगाणिस्तानचा अर्धा संघ तंबूत; मानवच्या फिरकीची जादू

**न्यू चंदीगड : वृत्तसंस्था**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामन्यात दुसऱ्या दिवसअखेर टीम इंडियाने सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व निर्माण केले आहे. पहिल्या डावात धावांचा डोंगर उभा केल्यानंतर भारतीय गोलंदाजांनी अफगाणिस्तानच्या फलंदाजीला सुरुवातीपासूनच दबावात ठेवले. या सामन्यात भारताकडून मानवने पदार्पण करत अफगाण फलंदाजांना अडचणीत टाकले आहे. त्याने १६ षटकात २१ धावा देत तीन विकेट्स घेतल्या आहेत.




भारताने पहिल्या डावात ८ बाद ५६४ धावांवर डाव घोषित केला. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानची सुरुवात अत्यंत खराब झाली. दुसऱ्या दिवसाच खेळ संपेपर्यंत अफगाणिस्तानने पाच विकेट्स गमावत ११३ धावा केल्या आहेत. ते भारताच्या धावसंख्येपेक्षा ४५१ धावांनी पिछाडीवर आहेत.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात भारताने ३ बाद ३६८ धावांपासून केली. कर्णधार शुबमन गिल याने मोठी धावसंख्या उभारण्याचा प्रयत्न केला. त्याने १२६ धावांची खेळी साकारली त्यानंतर तो मोहम्मद सलामच्या चेंडूवर बाद झाला. दुसरीकडे ऋषभ पंत याने आक्रमक फलंदाजी करत ८१ धावा केल्या.दोघांनी चौथ्या विकेटसाठी १६९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचून भारतीय डावाला आणखी मजबुती दिली. त्यानंतर वॉशिंग्टन सुंदर याने नाबाद अर्धशतक झळकावत भारताची धावसंख्या ५६४ धावांपर्यंत पोहचवली.

धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानला भारतीय वेगवान गोलंदाजांनी सुरुवातीला धक्के दिल्यानंतर मानवने फिरकीची जादू हळू हळू दाखवली. पदार्पणाच्या सामन्यात त्याने अचूक गोलंदाजी करीत अफगाणिस्तानच्या मधल्या फळीची वाताहात केली. त्याने अफगाणस्तानच्या तीन फलंदाजांना बाद केले. मानवच्या प्रभावी गोलंदाजीमुळे सामन्यावरील भारताची पकड घट्ट झाली आहे.

एकीकडे विकेट्स पडत असताना अनुभवी रहमत शाह खंबीरपणे उभा राहिला. तो ४३ धावांवर नाबाद असून अफगाणिस्तानचा डाव सावरण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र दुसऱ्या टोकाला त्याला पुरेशी साथ मिळालेली नाही.

पहिल्या डावातील प्रचंड धावसंख्या व त्यानंतर मोठी सुरुवात करून देण्यात भारतीय संघाला यश आले आहे. तिसऱ्या दिवशी भारताचे लक्ष्य अफगाणिस्तानचा उर्वरित डाव लवकर आटोपून मोठी आघाडी मिळवण्याकडे असेल. सध्या सामन्याची सर्व सूत्रे भारताच्या हातात असून पदार्पणवीर मानवची प्रभावी गोलंदाजी भारतासाठी फायद्याच ठरली आहे.

# लाल मातीतील नवी सम्राज्ञी!

## मिरा अँड्रीवाने फ्रेंच ओपनचे विजेतेपद जिंकले

**पॅरिस : वृत्तसंस्था**

फ्रेंच ओपन स्पर्धेतील महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात रशियन युवा टेनिसपटू मिरा अँड्रीवा हिने एकहाती सामना जिंकत नवा इतिहास रचला आहे. अंतिम सामन्यात तिने पात्रता फेरीतून फायनलपर्यंत मजल मारणाऱ्या पोलंडच्या माजा च्वालिंस्का हिला ६-३, ६-२ असा पराभूत केले.

अवघ्या एक तास २२ मिनिटांत मॅच संपवत अँड्रीवाने वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी पहिल्यांदाच ही स्पर्धा गाजवली. एवढेच नव्हे तर १९९२मध्ये मोनिका सेलेसनंतर पॅरिसमध्ये ग्रँडस्लॅम जिंकणारी ती सर्वात युवा महिला खेळाडूही ठरली आहे. मोनिका सेलेस हिने वयाच्या १८व्या वर्षी ही स्पर्धा गाजवण्याचा पराक्रम करून दाखवला होता.

दुसरीकडे पात्रता फेरीतून (क्वालिफायर) मुख्य स्पर्धेत प्रवेश मिळवत अंतिम फेरीपर्यंत धडक मारणाऱ्या माजा च्वालिंस्का हिला इतिहास रचण्याची संधी होती. रोलाँ गारोसच्या इतिहासात जेतेपद जिंकणारी पहिली क्वालिफायर बनण्याचे तिचे स्वप्न होते, मात्र अंतिम सामन्यातील पराभवामुळे तिला उपविजेतेपदावरच समाधान मानावे लागले. पोलंडच्या २४ वर्षीय टेनिस स्टारला १९ वर्षीय युवा



टेनिस्टारकडून एकहाती पराभवाचा सामना करावा लागला असला तरी माजा च्वालिंस्काचा इथंपर्यंतचा प्रवास सर्वांना थक्क करून सोडणारा आणि मनात घर करून राहणारा असा होता.

अंतिम सामन्यापूर्वीच रशियन युवा टेनिस स्टार मिरा अँड्रीवा हिला विजेतेपदाची प्रबळ दावेदार मानले जात होते. संपूर्ण स्पर्धेत तिने सर्वोत्तम दर्जाची कामगिरी करून दाखली. अंतिम सामन्याआधी शेवटच्या तीन सामन्यांत तिने प्रतिस्पर्ध्यांना केवळ १२ गेम्स जिंकू दिले होते. कोर्टवर उतरताच ती भावी ग्रँडस्लॅम विजेत्याप्रमाणे आत्मविश्वासाने खेळताना दिसत होती. या जेतेपदासह तिने ग्रँडस्लॅममध्ये नवी सम्राज्ञी उवतरल्याचे दाखवून दिले आहे.

# भारतीय महिला संघ 'सॅफ चॅम्पियन'; विक्रमी सहावे जेतेपद

## गतविजेत्या बांगलादेशला नमवून फडकवला तिरंगा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय महिला फुटबॉल संघाने तब्बल सात वर्षांनंतर दक्षिण आशियाई फुटबॉल चॅम्पियनशिप (SAFF Championship) जिंकत इतिहास रचला आहे. शनिवारी झालेल्या अंतिम सामन्यात भारताने गतविजेत्या बांगलादेशला ३-१ अशा फरकाने नमवत जेतपद आपल्या नावे केले आहे. भारतीय महिलांनी सात वर्षांनंतर जेतेपद जिंकले आहे.

अंतिम सामन्यात भारताने सुरुवातीपासून आक्रमण करीत बांगलादेशवर दबाव टाकला. सामन्याच्या ४२व्या मिनिटाला प्यारी जाख्सा हिने गोल मारत भारताला आघाडी मिळवून दिली. मात्र पहिल्या हाफच्या एक्स्ट्रा वेळेत रितू पोर्णा हिने गोल करत बांगलादेशला १-१ अशी बरोबरी साधून दिली. यामुळे सामन्यात रंगत वाढली.

दुसऱ्या हाफमध्ये भारताने जोरदार



पुनरागमन केले. सनफिदा नोंगरुम हिने शानदार हेडरद्वारे गोल करत भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भारताने सामन्यावर आपली पकड मजबूत केली. लिंडा कोम सेर्तो हिने ८२ मिनिटात बांगलादेशच्या बचावफळीतील चुकीचा फायदा घेत शानदार गोल नोंदवला. या गोलने भारताचा विजय निश्चित झाला.

या स्पर्धेत भारतीय महिला संघाने एकही सामना न गमावता जेतेपद पटकावला आहे. भारताने चारही सामने जिंकले आहेत. यात भारताने तब्बल १८ गोल केले, तर प्रतिस्पर्ध्यांना केवळ एकच गोल करण्याची संधी दिली. सलग तिसऱ्या विजेतेपदाच्या शोधात असलेल्या बांगलादेशचा प्रवास अंतिम फेरीतच थांबला. या ऐतिहासिक विजयासह भारतीय फुटबॉलमधील अनुभवी खेळाडू डांगमेई ग्रेसने आंतरराष्ट्रीय फुटबॉलला निरोप दिला आहे. ग्रेसने भारतासाठी २०१३ साली पदार्पण केले होते. तिने भारतासाठी ९५ सामने खेळत फुटबॉलला निरोप दिला आहे.

## वैभव सूर्यवंशीसाठी बीसीसीआयने बदलला नियम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्ससाठी आपल्या स्फोटक खेळीने खळबळ माजवणारा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीचा भारतीय टी-२० संघात समावेश करण्यात आला आहे. लहान वयातच मिळालेल्या या प्रचंड आंतरराष्ट्रीय यश आणि प्रसिद्धीच्या पार्श्वभूमीवर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

अवघ्या १५ वर्षांच्या वयात अचानक मिळालेली प्रसिद्धी, माध्यमांचे लक्ष आणि वरिष्ठ संघाचा प्रचंड दबाव हाताळणे हे कोणत्याही मुलासाठी मानसिकदृष्ट्या आव्हानात्मक असू शकते. परिणामी बीसीसीआयने वैभव सूर्यवंशीचे आई-वडीलदेखील इंग्लंड आणि आयर्लंडच्या आगामी दौऱ्यावर टीम इंडियासोबत प्रवास करतील असा निर्णय घेतला आहे.

# श्रेयस अय्यरला कर्णधार केल्याने आनंदी -सूर्यकुमार




**मुंबई : प्रतिनिधी**


आगामी इंग्लंड-आयर्लंड टी-२० दौऱ्यासाठी शनिवारी भारतीय संघाची घोषणा झाली. या संघाच्या कर्णधारपदावरून सूर्यकुमार यादवला हटवण्यात आले. त्याच्या जागी श्रेयस अय्यर संघाचा नवा कर्णधार झाला. कॅप्टन्सीवरून हटवल्यानंतर आणि संघातून वगळल्यानंतर स्टार फलंदाज सूर्यकुमार याबाबत बोलला.

"श्रेयस अय्यरसाठी मी खूप खुश आहे. त्याला भारतीय टी-२० संघाचा कर्णधार केल्याबद्दल मला खूप आनंद वाटतो आहे. आम्ही दोघांनी मुंबईत एकत्र भरपूर क्रिकेट खेळले आहे, पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, भारतीय टी-२० संघाचे गेले तीनही कर्णधार हे मुंबईकडूनच आहेत या गोष्टीचा मला जास्त आनंद आहे. मुंबईकरांसाठी हा गौरवाचा क्षण आहे आणि त्यांनी याचा नक्कीच आनंद साजरा करायला हवा," असे सूर्यकुमार यादव म्हणाला.

२०२६च्या टी-२० विश्वचषकात भारताला विजय मिळवून देऊनही सूर्यकुमार यादवने केवळ कर्णधारपद गमावले. आगामी मालिकेसाठीच्या संघातही त्याचा समावेश करण्यात आला नाही. बीसीसीआयने नवीन संघ निवडल्यानंतर सूर्याने आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर केली. त्याने बीसीसीआयने जाहीर केलेला फोटो शेअर केला आणि लिहिले, या अत्यंत सक्षम दमदार गटाला पुढील आव्हानांसाठी माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा!

# टी-२० लीगमध्ये शमीची हॅट्ट्रिक

**कोलकाता : वृत्तसंस्था**



भारतीय संघाबाहेर असलेला वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने शनिवारी बंगाल टी-२० लीगमध्ये हॅट्ट्रिक घेत मोठी कामगिरी केली. गार्डन्सवर सर्वोटेक सिलिगुडी स्ट्रायकर आणि श्राची राई टायगर्स यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्यात त्याने या स्पर्धेतील पहिली हॅट्ट्रिक घेतली. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर सिलिगुडी स्ट्रायकर संघाने हा सामना २४ धावांनी जिंकला.

सिलिगुडीने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ बाद २०८ धावा केल्या होत्या. विशालने संघासाठी ४६ चेंडूत ८६ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याने आपल्या खेळीत सहा षटकार आणि पाच चौकार मारले. या आव्हानाचा पाठलाग करताना श्राची राई टायगर्स संघाला २० षटकांत ४ बाद १८४ धावाच करता आल्या. संघाकडून शुवम डे याने २५ चेंडूत ४८ आणि राहुलने २६ चेंडूत ४४ धावा केल्या.

वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने डावातील १६व्या षटकात सलग तीन चेंडूंवर तीन बळी घेतले. त्याने चौथ्या चेंडूवर शाहबाज अहमदला बाद केले. त्यानंतर पुढील चेंडूवर रोहित कुमार आणि दीपांजन मुखर्जी यांना बाद करत आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली. शमीने ४ षटकांत २७ धावा देत चार बळी घेतले, तर करण लालनेही ३६ धावा देत तीन बळी घेतले.

# दुखापतीवर मात करून सतीश पाताडे बनले 'स्ट्राँग मॅन'



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य पॉवरलिफ्टिंग संघटनेच्या वतीने सिनियर, ज्युनिअर, सब ज्युनिअर, मास्टर्स पुरुष व महिला आणि अंध व गतिमंद दिव्यांग यांची स्पर्धा मुंबईतील वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात झाली. यामध्ये सतीश मुरलीधर पाताडे यांना मास्टर्स-३ गटात स्ट्राँग मॅन ऑफ महाराष्ट्र किताबाने गौरविण्यात आले. पाताडे यांना दुखापत असताना सुवर्णपदकासह किताब मिळवला हे विशेष कौतुकास्पद आहे.

नागरी सेवा विश्वस्त मंडळाच्या वतीने इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग स्पर्धा राज्य संघटनेचे सचिव संजय सरदेसाई यांच्या नेतृत्वाखालील पार पडली. मास्टर्स ३ गटातील स्ट्राँग मॅन ऑफ महाराष्ट्र किताबाने गौरविण्यात आलेले सतीश पाताडे हे शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित खेळाडू असून मंत्रालयातील सेवानिवृत्त अधिकारी आहेत. त्यांनी नऊ आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये देशाला १९ पदके मिळवून दिली तसेच त्यांनी आतापर्यंत किमान २०वेळा स्ट्राँगमॅन किताब जिंकलेला आहे. नव्या किताबाबद्दल त्यांचे शिव छत्रपती पुरस्कार सन्मानित व आंतरराष्ट्रीय पदक विजेते तथा युनायटेड क्लब ठाणेचे कोच अनंत चाळके यांच्यासह इतरांनी अभिनंदन केले.

# भारतीय हॉकी संघाचा आशियात दबदबा! तिसऱ्यांदा विजेते

**टोकियो : वृत्तसंस्था**

एकतर्फी झालेल्या १८ वर्षांखालील मुलांच्या आशियाई हॉकी स्पर्धेच्या अंतिम लढतीत भारतीय हॉकी संघाने जपानचा ४-१ने धुव्वा उडवत विजेतेपदावर कब्जा केला. या स्पर्धेतील भारताचे हे तिसरे विजेतेपद आहे तसेच या विजेतेपदासोबत भारतीय हॉकी संघाने आशियाई हॉकीमध्ये पुन्हा एकदा आपला दबदबा सिद्ध केला आहे.

उपांत्य लढतीत पाकिस्तानला ५-१ने पराभूत केल्यानंतर भारतीय संघ या लढतीत आत्मविश्वासाने उतरला होता. दरम्यान, यजमान जपानविरुद्ध झालेल्या एकतर्फी लढतीत भारताचा स्टार खेळाडू पूर्ती आशिष तानी याने जबरदस्त हॅट्ट्रिक नोंदवत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली, तर कर्णधार केतन कुशवाहा यानेही एक गोल केला. भारतीय संघाच्या आक्रमक खेळासमोर जपानचा संघ टिकाव धरू शकला नाही. जपानकडून एकमेव गोल हा गाकू नुमादा याने केला.

या लढतीत भारतीय खेळाडूंनी सुरुवातीपासून आक्रमक खेळाचं प्रदर्शन केले तसेच बहुतांश वेळ चेंडूवर नियंत्रण ठेवत जपानी खेळाडूंवर वर्चस्व राखले. अखेरीस पूर्ती आशिष तानीने केलेले तीन गोल आणि केतन कुशवाहा याच्या दोन गोलांच्या जोरावर भारताने हा सामना ४-१ अशा मोठ्या फरकाने जिंकला.

## मुलींच्या संघाला कांस्यपदक

भारतीय मुलींच्या संघाने दक्षिण कोरियाचा ३-० असा पराभव



करून कांस्यपदक मिळवले. 'हॉकी इंडिया'ने या कामगिरीबद्दल कुमार संघातील खेळाडूंना प्रत्येकी तीन लाख, तर प्रशिक्षकांसह साहाय्यकांना प्रत्येकी दीड लाख रुपयाचे पारितोषिक जाहीर केले. कांस्यपदक मिळवणाऱ्या भारतीय मुलींच्या संघालादेखील रोख पारितोषिक जाहीर करण्यात आले असून प्रत्येक खेळाडूस रोख एक लाख आणि साहाय्यकांस ५० हजार रुपये दिले जातील.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com